रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १२८
www.ramprahar.com
◆ मंगळवार, २५ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

महापारेषण जनसंपर्क विभागाला राष्ट्रीय पुरस्कार/२
अलिबागमध्ये उमेदवारांचा डिजिटल प्रचारावर भर/५
टीम इंडिया २०१ धावांमध्ये गारद; आफ्रिकेकडे आघाडी/८

## भारताच्या मुलींनी सलग दुसऱ्यांदा जिंकला कबड्डी वर्ल्डकप



**ढाका** : नोव्हेंबरचा महिना भारतीय महिला खेळाडू गाजवताना दिसत आहेत. २ नोव्हेंबर रोजी हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारतीय महिला क्रिकेट संघाने वनडे वर्ल्डकप स्पर्धा जिंकली. त्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी भारतीय अंध महिला क्रिकेट संघाने पहिला ब्लाइंड वूमन्स टी-२० वर्ल्डकप जिंकला. त्यानंतर आता कबड्डीमध्ये भारतीय महिलांनी भारताचा तिरंगा अभिमानाने फडकावला आहे. भारतीय महिला कबड्डी संघाने सोमवारी (दि. २४) सलग दुसऱ्यांदा वर्ल्डकप जिंकला. ढाकामध्ये झालेल्या महिला कबड्डी वर्ल्डकप स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने चीनी तैपेई संघाला ३५-२८ अशा फरकाने पराभूत करून वर्ल्डकपवर नाव कोरले. भारतीय संघाच्या या विजयानंतर त्यांचे देशभरातून कौतुक होत आहे.

# तरुणाईला संधी देणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**



तरुणाईच्या माध्यमातून समाजात आणि राजकारणात परिवर्तन शक्य असल्याचे सांगत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपचे ४० टक्के उमेदवार हे तरुण असतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. मुंबईत सोमवारी (दि. २४) आयआयएमयूएन आयोजित 'युथ कनेक्ट' कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी युवावर्गाशी संवाद साधला. या वेळी युवावर्गासाठीच्या अनेक योजना आणि मुंबईतील महत्त्वाच्या प्रकल्पांविषयी त्यांनी माहिती दिली.

लोकशाही अधिक सक्षम आणि सर्वसमावेशक करण्यासाठी युवांचा सहभाग अत्यावश्यक आहे. आजच्या लोकशाहीत युवा नागरिक फक्त दर्शक नसून स्वतःचे मत असलेले महत्त्वाचे स्टेकहोल्डर्स आहेत. युवांच्या मतांना स्थान दिल्याशिवाय लोकशाहीची प्रक्रिया पुढे जाऊ शकत नसल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री इंटर्नशीप योजनेमुळे अनेक तरुणांना रोजगार मिळण्यासाठी मदत झाली. ही योजना राज्यात यशस्वी झाली. त्यामुळे इतर राज्येसुद्धा ही योजना राबवत आहेत, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, लोकशाही दोन पद्धतीने चालते, एक विचारधारेने आणि दुसरी संख्याबळावर (नंबर्स). तुमच्याकडे संख्याबळ नसेल, तर तुम्ही एखादी विचारधारा चालवू शकणार नाही. प्रशांत किशोर हे नावाजलेले राजकीय रणनीतीकार आहेत. मी त्यांचे काम जवळून पाहिले आहे. त्यांनी बिहारच्या निवडणुकीत एक विचारधारा मांडली, पण मतदारांनी त्यांना कौल दिला नाही. अशा वेळी संख्याबळाशिवाय बदल घडवणे अशक्य आहे. माझ्या मते, येत्या काही वर्षांत विचारधारा राजकारणाच्या केंद्रस्थानी असेल.

## उरण शहराला विकासाच्या नव्या उंचीवर नेणार -आमदार महेश बालदी



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

उरण हे विकासाचे शहर झाले आहे. येथे रस्ते, रेल्वे, नगर परिषद इमारत, समाजमंदिर यांसारखी अनेक कामे पूर्णत्वास आली असून काही प्रगतिपथावर आहेत. उरणच्या विकासासाठी शंभर कोटींचा निधी आणला, पण कधी जातीपातीचे राजकारण केले नाही. आगामी काळातही आपल्याला सर्वांना सोबत घेऊन पुढे जायचे असून उरण शहराला विकासाच्या नव्या उंचीवर पोहचवायचे आहे. त्यासाठी भाजप महायुतीच्या नगराध्यक्ष व नगरसेवकपदाच्या उमेदवारांना बहुमताने निवडून द्या, असे आवाहन आमदार महेश बालदी यांनी रविवारी (दि. २३) जाहीर सभेत केले.

उरण नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग क्रमांक ६मधील भाजप महायुतीच्या उमेदवार स्नेहल भीमदास कासारे, रिना निलेश पाटील, प्रभाग क्रमांक ७मधील उमेदवार शाहिस्ता इब्राहिम कादरी, रवी यशवंत भोईर यांच्या प्रचारार्थ उरण कोटनाका बुरूडआळी येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते.

व्यासपीठावर आमदार महेश बालदी यांच्यासह भाजप शहराध्यक्ष कौशिक शाह, नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शोभा कोळी-शाह, माजी नगराध्यक्ष चंद्रकांत गायकवाड, गणेश पाटील, रेयान तुंगेकर, राजू खान, तारीफ भाईजी, जसीम गॅस यांच्यासह उमेदवार उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार महेश बालदी म्हणाले की, आम्ही मत मागतो, कारण जनतेसाठी कामे करतो. आमच्या काळात उरण शहरात चांगले रस्ते बांधण्यात आले आहेत. बायपास रस्त्याचे काम प्रगतिपथावर असून तोही लवकर सुरू होईल. भव्य व सुसज्ज अशी नगर परिषदेची इमारत बांधली. अटल सेतू झाला. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे म्हणून आम्ही प्रयत्न केले. रेल्वेसेवा सुरू केली. या रेल्वेसेवेचा दररोज २० हजार नागरिकांना फायदा होत आहे. उरण-पनवेल, उरण-ठाणे, उरण ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलपर्यंत रेल्वे सुरू होणार आहे. आम्ही उरण शहरात समाजमंदिर बांधले, फुल मार्केट बांधले. टाऊनहॉलचे काम ९० टक्के झाले आहे. **(पान २ वर..)**

### विरोधकांचा घेतला समाचार

या वेळी आमदार महेश बालदी यांनी विरोधकांचा समाचार घेतला. केवळ सोशल मीडियावर फोटो-व्हिडीओ टाकून काहीही होत नाही. प्रत्यक्षपणे विकासकामे करावी लागतात, निधी आणावा लागतो, जे विरोधकांना करणे अशक्य आहे. विकासकामांच्या जोरावर या निवडणुकीत आम्ही नक्कीच विजय मिळवू, असा विश्वास व्यक्त करून ३ डिसेंबर रोजी सर्वांनी विजयाची दिवाळी साजरी करायची आहे, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले.



**कामोठे : येथील दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.च्या नव्या शाखेचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी त्यांनी स्थानिक विकासात सहकार क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. या कार्यक्रमाला भाजप कामोठे शहर मंडळ अध्यक्ष विकास घरत यांच्यासह सोसायटीचे पदाधिकारी, संचालक मंडळ सदस्य, कर्मचारीवृंद व नागरिक उपस्थित होते.**

## बॉलीवूडचा 'ही-मॅन' हरपला!
### ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचे निधन



**मुंबई** : बॉलीवूडचे सुप्रसिद्ध अभिनेते धर्मेंद्र यांचे सोमवारी (दि. २४) निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर मुंबईतील पवनहंस स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

६५ वर्षांच्या प्रदीर्घ कारकिर्दीत ३००हून जास्त चित्रपटांमध्ये भूमिका करणारे धर्मेंद्र यांनी १९६०मध्ये दिल भी तेरा हम भी तेरे या चित्रपटातून रूपेरी पडद्यावर पदार्पण केले. देखणे, रूबाबदार व्यक्तिमत्व आणि संवेदनशील चेहरा या वैशिष्ट्यांच्या बळावर धर्मेंद्र यांनी नायकाच्या प्रभावी भूमिका साकारल्या. २००४ ते २००९ या काळात त्यांनी लोकसभेत बिकानेर मतदारसंघाचे प्रतिनिधित्वही केले. त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## निवडक

### 'माहे' युद्धनौका भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल

**मुंबई** : माहे ही युद्धनौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली. माहे श्रेणीतली ही पहिली पाणबुडीविरोधी उथळ पाण्यातली युद्धनौका कोचीच्या जहाजबांधणी गोदीत तयार झाली असून यात ८० टक्क्यापेक्षा जास्त सामग्री स्वदेशी बनावटीची आहे. मलबार किनारपट्टीवरच्या माहे या ऐतिहासिक गावावरून तिचे नाव ठेवण्यात आले आहे. या युद्धनौकेचे प्रतीक असलेली उरुमी ही तलवार, कलरिपयट्टू या युद्धकलेचा महत्त्वाचा भाग आहे.

### देशाचे ५३वे सरन्यायाधीश सूर्य कांत यांचा शपथविधी

**नवी दिल्ली** : देशाचे ५३वे सरन्यायाधीश म्हणून सोमवारी (दि. २४) न्यायमूर्ती सूर्य कांत यांनी शपथ घेतली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू त्यांना पदाची शपथ दिली. उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाचे सदस्य या वेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती सूर्यकांत संवैधानिक आणि दिवाणी कायदेक्षेत्रातले तज्ज्ञ असून २०१९पासून ते सर्वोच्च न्यायालयात न्यायदान करत आहेत.

## वाशी येथे रयत शिक्षण संस्थेची कार्यशाळा उत्साहात
### चेअरमन चंद्रकांत दळवी, लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती





**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्था सातारा आणि रायगड विभाग कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मुख्याध्यापक व लेखनिक २०२५-२६ कार्यशाळा सोमवारी (दि. २४) वाशी येथील मॉडर्न स्कूलमध्ये उत्साही वातावरणात झाली. संस्थेच्या शैक्षणिक, प्रशासकीय आणि व्यवस्थापन कौशल्यवृद्धीच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वपूर्ण ठरली.

### अत्याधुनिक प्रयोगशाळेचे उद्घाटन

कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य व थोर देणगीदार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, उपाध्यक्ष जयश्री चौगुले, डॉ. राजेंद्र मोरे, माजी सचिव व महात्मा फुले पनवेल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, ज्योत्स्ना ठाकूर, शिबिराचे मुख्य मार्गदर्शक प्रशांत साळुंखे, रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, उपविभागीय अधिकारी विलास जगताप, मॉर्डन स्कूलच्या प्राचार्य सुमित्रा भोसले यांच्यासह रायगड विभागाच्या विविध शाखांतील मुख्याध्यापक, लेखनिक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यशाळेच्या निमित्ताने विद्यालयामध्ये उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक सेंटर ऑफ एक्सलन्स प्रयोगशाळेचे उद्घाटन चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी त्यांनी उपस्थितांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. आधुनिक शैक्षणिक तंत्रज्ञान आणि नवोपक्रमांना चालना देणाऱ्या या प्रयोगशाळेमुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावृद्धीस मोठी मदत होईल, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यशाळेत प्रशासनिक कौशल्य, शैक्षणिक नियोजन, शाळा व्यवस्थापन, सहकार्यपूर्ण टीमवर्क तसेच नवीन शैक्षणिक धोरणांच्या अंमलबजावणीसंबंधी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या वेळी मान्यवरांनी रयत शिक्षण संस्थेची दीर्घकालीन परंपरा, कार्यपद्धती, जबाबदाऱ्या तसेच भविष्यातील शैक्षणिक योजना यावर प्रकाश टाकला.

## पोलादपूरमध्ये मिनीबस अपघातात २२ जण जखमी



**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर पोलादपूर तालुक्यातील भोगाव बुद्रुकनजीक सोमवारी (दि. २४) पहाटे साडेचारच्या सुमारास दाट धुक्यात अपघात झाला. स्वारगेट (पुणे)हून दापोलीकडे जाणारी खासगी मिनीबस महामार्गावरील पुलाच्या अलिकडे अंदाजे ४५ ते ५० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात २२ जण जखमी झाले आहेत.

पहाटेच्या धुक्यात श्री साई ट्रॅव्हल्सची मिनीबस (एमएच १२ वायबी २८३५) लोखंडी संरक्षक कठड्यांसह दरीकडे झेपावली. अपघातात शामल विजय आंजर्लेकर (४०, गिम्हवणे, दापोली), काजल मारूती शिगवण (२३, दमामे, दापोली), दिलीप शिवराम मोहिते (५५, तळसर, चिपळूण), अमरनाथ मिलिंद कांबळे (२७, किल्लारी, लातूर), दिपाली दत्ताराम काचरे (२७, भडवणे, दापोली), प्रतिक प्रकाश गुरव (२२, शिरवली, खेड), प्रिया प्रकाश गुरव (२३, शिरवली, खेड), आनंदी बालाजी नाचरे (७४, दमामे, दापोली), सर्वेश दीपक गुहागरकर (२२, आडे, दापोली), मुजिब अल्लाबकाश दलाल (१९, काळकाई कोंड, दापोली), मयुरी मारुती शिगवण (४५, दमामे, दापोली) याशिवाय चालक, वाहक तसेच इतर नऊ प्रवासी जखमी झाले.

या वेळी स्थानिक नागरिकांनी अपघातस्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले, तर पोलीस व महामार्ग सुरक्षा पथकानेही मदतकार्य करीत जखमींना रुग्णालयात दाखल केले.

## भाजपच्या माध्यमातून नागरिकांना विविध सुविधा -माजी सभागृह नेते परेश ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठे परिसरात नागरीकरण वेगाने होत असल्याने ते विकासात्मक असावे या दृष्टिकोनातून भारतीय जनता पक्ष काम करीत असून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून देत आहे, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कामोठे येथे सिग्नलच्या लोकार्पण सोहळ्यावेळी केले.

पनवेल महापालिका हद्दीतील कामोठ्यामध्ये भाजपच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सिग्नल यंत्रणा कार्यान्वित झाली आहे. विस्टा कॉर्नर येथे उभारण्यात आलेल्या या सिग्नलचे लोकार्पण माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २३) करण्यात आले.

### कामोठे येथे सिग्नलचे लोकार्पण



या कार्यक्रमास भाजपचे कामोठे शहराध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, दिलीप पाटील, गोपीनाथ भगत, डॉ. अरुणकुमार भगत, माजी नगरसेविका पुष्पा कुत्तरवडे, हेमलता गोवारी, कुसुम म्हात्रे, **(पान २ वर..)**

## महिलांचा सन्मान राखा, अपप्रचार करू नका -सुरेश लाड

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत नगर परिषदेच्या निवडणुकीत सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार केला जात आहे. अगदी वैयक्तिक टीका होत आहे, परंतु नगराध्यक्षपदाच्या उमेदवार महिला आहेत. त्यांच्याबद्दल अपप्रचार करू नका. महिलांचा सन्मान राखला गेला पाहिजे. निवडणुका येतील आणि जातील, मात्र आपले संबंध बिघडवू नका, कारण आपण सर्वांनी कधी ना कधी एकत्रित काम केले आहे याची जाणीव राखणे गरजेचे आहे. प्रचारात आपल्या कर्जतच्या परंपरेला बाधा येऊन देऊ नका, असे भावनिक आवाहन माजी आमदार सुरेश लाड यांनी सोमवारी (दि. २४) पत्रकार परिषदेत केले.

दहिवली येथील संकल्प भवनाच्या सभागृहात सध्यस्थितीतील निवडणूक प्रचाराबद्दल पत्रकारांशी संवाद साधण्यासाठी माजी आमदार सुरेश लाड यांनी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. या वेळी ते म्हणाले की, कर्जत परिवर्तन विकास आघाडीतील नितीन सावंत यांनी घराणेशाही नष्ट करण्याची भाषा केली. ते कुणाची घराणेशाही नष्ट करणार आहे. त्यांच्याच आघाडीतील चंदन, जोशी, बैलमारे, पालकर की आणखी कुणाची? हे समजत नाही. आमचे तसेच या साऱ्या कुटुंबियांचे कर्जतच्या जडणघडणीत योगदान आहे. मी तर सन १९७७सून समाजकारण व राजकारणात आहे. माझ्या परिवाराचे काही तरी योगदान आहे. त्यामुळे अशी भाषा वापरणे योग्य नाही. मी सुरुवातीला या निवडणुकीत माझ्या सुनेला उतरवणार नव्हतो, परंतु पक्षश्रेष्ठींचा आग्रह असल्याने मी हा निर्णय घेतला, असेही लाड यांनी स्पष्ट केले.

महिलांबद्दल बोलताना त्यांचा आदर राखला पाहिजे. जे कोणी व्यवसाय करीत असतील, तर ते शासनाच्या परवान्याने करीत आहेत. इतक्या खालच्या थरावर जाऊन प्रचार करणे योग्य नाही. सोशल मीडियावर टाकण्यात येणाऱ्या पोस्ट मनाला पटणाऱ्या नाहीत. माझा भाचा उदय पाटील किंवा आमच्या कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारच्या पोस्ट टाकल्या गेल्या असतील, तर त्याबद्दल मी जाहीर माफी मागतो. माझी सून डॉ. स्वाती लाड अननुभवी आहे, असे सांगितले जाते. मग निवडणूक जाहीर झाल्यावर तिला परिवर्तन आघाडीच्या वतीने नगराध्यक्षपदाची निवडणूक लढऊ द्या. आम्ही सर्व काही करू, असे विचारले होते. तेव्हा ती अननुभवी नव्हती का, असा प्रश्न लाड यांनी केला. महायुतीची सत्ता आल्यास कर्जतचा नियोजनबद्ध विकास करू. कर्जतमध्ये पत्रकार भवन उभारले जात असेल तर मी माझ्याकडूनही सहकार्य करीन, असा शब्द त्यांनी या वेळी पत्रकारांना दिला.

# महापारेषण जनसंपर्क विभागाला राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन पारितोषिके जाहीर झाली असून यामध्ये भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार तसेच सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँड पीआर, सर्वोत्कृष्ट डफिल्म (इंग्रजी) पुरस्कार मिळाला आहे. राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार जाहीर झाल्याने महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी विभागाचे अभिनंदन केले आहे.

डेहराडून (उत्तराखंड) येथील हॉटेल एमराल्डमध्ये १३ ते १५ डिसेंबरला होणाऱ्या ४७ व्या आंतरराष्ट्रीय जनसंपर्क महोत्सवाच्या उदघाटन समारंभात या पुरस्काराचे वितरण होणार आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाची विविध पुरस्कारासाठी निवड करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत व बहिर्गत संपर्कासाठी राबविलेले




उपक्रम, महापारेषण समाचार या गृहमासिकातील डिजिटल बदल, क्यू-आर कोड तसेच इतर डिजिटल माध्यमांचा सकारात्मक पध्दतीने वापर, नागरिकांनी उच्च दाब वीजवाहिनीची काळजी कशी घ्यावी, सेवा पंधरवड्यात राबविलेले विविध सामाजिक उपक्रम, महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी सुरळीत वीजपुरवठ्यासाठी केलेली कामगिरी, ड्रोनच्या सहाय्याने दुर्गम भागात अखंड वीजपुरवठ्यासाठी केलेली कामगिरी हे फिल्ममध्ये ॲनिमेशनचा वापर करून दाखविले आहे. या फिल्मची दखल राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली आहे.

तसेच महापारेषणचे व्हॉटसअप बुलेटिन, ऑडिओ-व्हिज्युअल्स बुलेटिन, व्हॉटसअप चॅनेल, समाजमाध्यमांचा सकारात्मक पद्धतीने जनसंपर्कासाठी वापर करत केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचवल्या आहेत. ऊर्जा विभागाने केलेली सकारात्मक कामगिरी, पत्रकारिता व जनसंपर्क विभागाच्या विद्यार्थ्यांशी वार्तालाप, विविध प्रसारमाध्यमांच्या कार्यक्रमात महापारेषणची भूमिका विशद करण्यात आली आहे.

महापारेषणच्या जनसंपर्क विभागाने क्यू-आर कोडच्या माध्यमातून नोकरभरतीच्या जाहिराती डिजिटल स्वरूपात केल्या. डिजिटल ई-न्यूजलेटर फ्लिपबुकच्या स्वरूपात मांडले. जनसंपर्क क्षेत्रात १४ राष्ट्रीय पुरस्कार व एक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारी महापारेषण ही महाराष्ट्रातील पहिली शासकीय कंपनी ठरली आहे.

**पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाकडून महापारेषणला एकाच वेळी तीन राष्ट्रीय पारितोषिके मिळणे, ही आमच्या जनसंपर्क विभागाच्या नवकल्पनाशील कार्यपद्धतीची आणि टीमवर्कची दखल आहे. डिजिटल माध्यमांचा सकारात्मक वापर, पारदर्शकता आणि प्रभावी जनसंपर्क यामुळे महापारेषणने राष्ट्रीय स्तरावर एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. जनसंपर्क विभागाचे हे कार्य खरोखरच कौतुकास्पद आहे.**
**-डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.), अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण**

# खोपोली नगर परिषद निवडणुकीसाठी पोलीसही सज्ज

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद निवडणूक २०२५ शांततामय, पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त पार पाडण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस प्रशासन या निवडणुकीत अधिक कठोर आणि सक्रिय भूमिकेत उतरले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीमती आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल व खोपोली पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी शहरातील सर्व प्रभागांना भेट देत निवडणूक यंत्रणेची सखोल पाहणी केली.



आजच्या पाहणीदरम्यान डॉ. विशाल नेहुल यांनी कायदा व सुव्यवस्था भंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. निष्पक्ष, निर्भय आणि दबावमुक्त निवडणूक हा पोलीस प्रशासनाचा स्पष्ट हेतू असून, कोणत्याही प्रकारची अनुचित हालचाल सहन केली जाणार नाही,विशेष दक्षता, वाढीव गस्त आणि संशयितांवर बारकाईने नजर ठेवण्याचे आदेशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

२ डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व मतदान केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून सुरक्षेतील त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश दिले. मतदान केंद्रांची रचना, सीसीटीव्ही नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, वाहतूक व्यवस्थापन, असामाजिक घटकांवरील कारवाई तसेच निवडणूकपूर्व आणि निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीनची सुरक्षा यांचा त्यांनी काटेकोर आढावा घेतला.

खोपोलीमध्ये पोलीस दलाने दंगा काबू योजना राबवून तसेच रूट मार्च काढून निवडणूकपूर्व वातावरणात कायदा-सुव्यवस्था टिकवून ठेवण्याची तयारी पूर्ण केली आहे.

# भाजपा नेते प्रितम म्हात्रेंच्या पाठपुराव्याने रसायनी कॉर्नर ते डिंपल कंपनी रस्ता नूतनीकरण कामाला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायत तुराडे परिसरातील रसायनी कॉर्नर ते डिंपल कंपनी या रस्त्याच्या डांबरीकरण कामाला आज अधिकृत सुरुवात करण्यात आली आहे. स्थानिक नागरिकांच्या दीर्घकालीन मागणीनंतर आणि वाहतूक तसेच जनजीवनावर परिणाम करणाऱ्या रस्त्याच्या अत्यंत खराब परिस्थितीची दखल घेत,भाजपा नेते प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या पाठपुरावा व यशस्वी मध्यस्थीमुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तात्काळ कामाला प्रारंभ झाला.

यासाठी भाजप नेते प्रितम म्हात्रे यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ०१ पनवेल-रायगड यांना लेखी स्वरूपात स्मरणपत्र देत रस्त्याच्या डांबरीकरणाबाबत तातडीने लेखी आश्वासन देण्याची



मागणी केली होती. त्यानंतर झालेल्या पाठपुराव्यानंतर आज प्रत्यक्ष रस्त्याचे काम सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. काम सुरू होण्याच्या वेळी माजी पंचायत समिती सदस्य जगदीश पवार, ग्रामपंचायत तुराडे मा. सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड, रिया प्रदीप माळी ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक नागरिक व कार्यकर्ते उपस्थित होते. या कामामुळे रसायनी परिसरातील वाहतूक सुलभ होण्यासोबतच नागरिकांना होणारा त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. काही दिवसांत संपूर्ण रस्त्याचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे.

**जनतेच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेऊन समस्या निकाली लावणे ही आमची कार्यपद्धती आहे. ग्रामपंचायत तुराडे मा. सरपंच रंजना विश्वनाथ गायकवाड , रिया प्रदीप माळी यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पाठपुरावा केला होता. त्या अनुषंगाने आम्ही संबंधित विभागाशी सतत संपर्क ठेवून हे काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण व्हावे यासाठी प्रयत्न करून आज थांबलेल्या कामाची सुरुवात झाली आहे. लवकरच नियोजित वेळेत सदरचे काम पूर्ण होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत**
**-भाजप नेते प्रितम म्हात्रे, माजी विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका**

# वाशीत सिडको भूखंडावरील अतिक्रमण पालिकेने हटविले

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई, खाघर, उलवे नोडमध्ये सिडको मालकीच्या भुखंडावर अतिक्रमण करणार्यांवर निष्कासनाची कारवाई करण्यात येत आहे. सिडकोच्या अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत सोमवार २४ नोव्हेंबर रोजी वाशी नोड येथे निष्कासन मोहिम राबवण्यात आली.

सिडको संपादीत जागेवरील वाशी सेक्टर १९ (अ), भूखंड क्रमांक-५० व ५२ मौजे वाशी येथील अंदाजे इमारतीचे क्षेत्र ४००० चौमी अनधिकृत बांधकाम १० ते १२ ताडपत्री शेड गॅरेज,कंटेनर ,पार्किंग ट्रक जेसीबी व टोईंग गाडी च्या सहाय्याने निष्काशित करण्यात आले. नमूद अतिक्रमण सिडकोच्या प्रचलित नियमावली आणि धोरणांचा भंग करुन सिडको महामंडळाकडून कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले असल्यामुळे निष्कासित करण्यात आले.



सदरची मोहीम सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि नियंत्रक अनधिकृत बांधकामे यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको अतिक्रमण विभागाचे अधिकारी, पोलिस अधिकारी व सिडको पोलीस पथक, महावितरण विभागाचे अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक आणि महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे राबविण्यात आली. या कारवाईसाठी १ जेसीबी १ टोईंग गाडी, १० कामगार, ५ जीप वापरण्यात आले.

# दृढ निश्चय केल्यास स्वभाव बदलता येतो : डॉ आनंद नाडकर्णी

**अलिबाग : प्रतिनिधी**

विचार, भावना, सवयी म्हणजे स्वभाव. स्वभाव गतिशील आहे. दृढ निश्चय केला, प्रयत्नात सातत्य ठेवल्यास स्वभाव बदलता येतो, असे ठाम प्रतिपादन विख्यात मनोविकास तज्ज्ञ डॉ आनंद नाडकर्णी यांनी केले .

विद्यासन एज्युकेशनल फाउंडेशनतर्फे चिंतामणराव केळकर विद्यालय अलिबाग येथे रविवारी (दि.२३) स्वभावाला औषध आहे!या विषयावर डॉ. आनंद नाडकर्णी यांची मुलाखत



आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी ते बोलत होते. संतोष वझे आणि जान्हवी आगाशे यांनी डॉ. नाडकर्णी यांच्याशी संवाद साधला.

आपल्याला असणाऱ्या चांगल्या - वाईट सवयींनुसार आपला स्वभाव चांगला किंवा वाईट बनत जातो. स्वभाव बदलण्यासाठी सगळ्या सवयी एकदम बदलणे शक्य नाही. छोट्या छोट्या सवयी बदलणे हाच उपाय आहे . त्यासाठी सातत्याने प्रयत्न करायला हवेत, असे डॉ आनंद नाडकर्णी म्हणाले.

# राज्य निवडणूक आयोगाला 'आई'च्या नावाचे वावडे

**महाड : प्रतिनिधी**

राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची धुरा हातात घेतानाच सर्वात प्रथम शासकीय दस्तावेतात नावाचा उल्लेख करताना आईच्या नावाचा उल्लेख करण्याचा कायदा करून पुरोगामी महाराष्ट्राला नवी दिशा देण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आज मुख्यमंत्र्यांच्या दालनापासून ते शासकीय कर्मचाऱ्यांच्या दालना पर्यंत मंत्री व सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या नावांच्या पाट्या या आईच्या नावासह लिहिलेल्या आढळून येतात. त्याचप्रमाणे जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाच्या जन्म दाखल्या वरती देखील आईच्या नावाचा उल्लेख आता अनिवार्य करण्यात आला आहे. सर्व समाजातून या निर्णयाचे स्वागत होत असताना निवडणूक आयोगाच्या निवडणूक प्रक्रियेला मात्र या निर्णयाचा विसर पडल्याचे दिसून येत आहे.

मुलाच्या जन्मापासून त्याच्या शैक्षणिक, सामाजिक व शारीरिक सर्वांगीण विकासासाठी मातेचे योगदान मोलाचे असते. मात्र समाजामध्ये त्या मुलाची अथवा त्या पाल्याची ओळख ही केवळ त्याच्या पित्यापूर्ती मर्यादित राहते. या त्याच्या ओळखीमध्ये मातेचा कोणताच अंश नसल्याचे दिसते. ही भावना राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी मातेचे अस्तित्व प्रत्येक मुलाच्या अथवा मुलीच्या नावामध्ये असावे यासाठी वडिलांप्रमाणेच आईचे नाव देखील नावा मध्ये घेण्याचा निर्णय घेतला व त्याप्रमाणे कायदा करून पूरोगामी महाराष्ट्र मध्ये एक नवा आदर्श घालून दिला.

राज्यामध्ये होऊ घातलेल्या नगरपालिका व नगरपरिषद निवडणुका प्रक्रिया जवळपास पूर्ण झाली असून, उमेदवारांच्या याद्या पुर्ण झाल्या आहेत. प्रसिद्ध झालेल्या या उमेदवारांच्या नावांमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी किंवा निवडणूक निर्णय प्रक्रिया यांनी आईच्या नावाचा उल्लेख केला नसल्याचे दिसून येत आहे. या बाबत महाड नगरपालिका निवडणूक निर्णय अधिकारी महेश शितोळे यांना विचारणा केली असता या बाबत निवडणूक आयोगाकडून कोणत्याच सुचना प्राप्त झालेल्या नसल्याचे त्यांनी सांगितले त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करताना आईच्या नावाचा उल्लेख अनिवार्य नसल्याने उमेदवारांच्या नावात आई नाव समाविष्ट झालाले नाही. या वरुन असेच वाटते की, महाराष्ट्र सरकारच्या या ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निर्णयाचे महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला विसर पडला आहे का ? की त्यांना आईच्या नावाचे वावडे आहे का ? असा प्रश्न निर्माण होत आहे.

## पान १ वरुन

### उरण शहराला विकासाच्या नव्या उंचीवर नेणार -आमदार महेश बालदी

पान १ वरुन

आमच्याच सरकारने लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनवण्याचा प्रयत्न केला. अशी अनेक कामे आम्ही केली आहेत. केंद्रातून, राज्यातून विकासकामांसाठी निधी आणला आहे. या कामांच्या जोरावर जनता आम्हाला परत निवडून देईल.

या सभेला भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, चिटणीस शरद ठाकूर, तालुका मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, शहर मंडळ अध्यक्ष प्रसाद भोईर, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, उपाध्यक्ष पंडित घरत, मुकुंद गावंड, कामगार नेते सुधीर घरत, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष राणी म्हात्रे, शहराध्यक्ष संपूर्णा थळी, युवा मोर्चा शहराध्यक्ष निलेश पाटील, माजी नगरसेविका रजनी कोळी, जान्हवी पंडित, उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, जासई विभाग अध्यक्ष गोपीनाथ म्हात्रे, नवीन राजपाल, हितेश शाह, मनन पटेल, हस्तीमल मेहता, कैलास भोईर, विशाल पाटेकर, सीमा घरत, सामिया बुबेरे, मकरंद पोतदार, संतोष ओटवकर, राजस्थानी प्रवासी प्रकोष्ठ जिल्हाध्यक्ष पुखराज सुतार, विशाल पाटेकर, दिनेश ठक्कर, सुरज ठवले, कुणाल गायकवाड, रमजान शेख, स्वप्नील घरत, प्रमोद म्हात्रे, अनंत घरत, संजोग गांधी, त्रिंबक खंडाले, अजित भिंडे, ब्लेस कोळी, गिरीश परीहारिया, राजेंद्र ठाकूर, विशाल ठाकूर, गणेश घरत, सचिन वैद्य, प्रमोद म्हात्रे, प्रेम मढवी, दीपेश कोळी पुरुषोत्तम सेवक यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भाजपच्या माध्यमातून नागरिकांना विविध सुविधा -माजी सभागृह नेते परेश ठाकूर

रवींद्र जोशी, भाजपच्या जिल्हा चिटणीस विद्या तामखडे, सामाजिक कार्यकर्ते आर.जी. म्हात्रे, रवी गोवारी, भाऊ भगत, प्रदीप भगत, राजेश गायकर, संतोष म्हात्रे, सुरेश खरात, प्रकाश पाटील, शुभांगी खरात, युवा नेते हॅप्पी सिंग, सोशल मीडिया सेलचे जिल्हा संयोजक सुशील शर्मा, कामोठे शहर सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, चिटणीस दामोदर चव्हाण, विनोद खेडकर, जयकुमार डिगोळे, कामोठे शहर शिक्षक सेल संयोजक मनोहर शिंगाडे, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, सरचिटणीस प्रवीण कोरडे, युवा मोर्चा उपाध्यक्ष विकी टेकवडे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.


# वासुदेवाचे दर्शन होतेय दुर्मिळ

## बदलत्या युगात प्रभातस्वर झाले लुप्त

**खोपोली : प्रतिनिधी**

वासुदेव आला हो, वासुदेव आला, सकाळच्या प्रहरी हरिनाम बोला!' हे गाणे कानावर पडले की पहाटे गाव जागविणारा वासुदेव आठवतो. गळ्यात कवड्याच्या, मण्यांच्या माळा, अंगावर रंगीबेरंगी कपडे, दोन्ही हातात तांब्याचे कडे, हातामध्ये चिपळ्या, कपाळावर व कंठावर गंधाचे टिळे आणि डोक्यात मोरपिसाची टोपी असा हा आपलासा वाटणारा वासुदेव पूर्वी सकाळी घरोघरी फिरत होता. मात्र आता वासुदेव लुप्त होण्याच्या मार्गावर असून त्याचे दर्शन दुर्मिळच झाले आहे.

समाजप्रबोधन घडविणारे वासुदेव आता संगणक युगात लुप्त झाले आहेत.ग्रामीण भागात वासुदेवाचे महत्व विशेष होते. परंतु आता त्याचे मुळात दर्शनच दुर्मिळ झाले आहे. त्यामुळे वासुदेव आला



हो, वासुदेव आला हे स्वर कानी पडतच नाहीत. कृष्णाचा अवतार मानल्या जाणार्या वासुदेवाला संगणक युगात थारा नाही हे तितकेच खरे. शहरातून नव्हे तर खेड्यातूनही हा वासुदेव हद्दपार झाला आहे. भात कापणी झाली की वासुदेव घरोघरी जाऊन धान्य मागायचा, बच्चे कंपनी वासुदेवाच्या आवाजाने पहाटे उठून त्याच्या मागे फिरायची, ती मजा काही औरच होती. 'वासुदेव हरी वासुदेव हरी सकाळच्या पहारी आली वासुदेवाची स्वारी' अशी गाणी म्हणत आपल्या दोन्ही हातातील चिपळ्या वाजवत अभंग म्हणत वासुदेव धान्य मागत होते.

वासुदेव ही पिढय़ान पिढ्या चालत आलेली एक परंपरा आहे. मात्र, ही परंपरा टिकविण्यासाठी सध्या कोणीही धजावत नाही. शहरीकरणात फ्लॅट संस्कृतीमुळे वासुदेवाला इमारतीत प्रवेश मिळत नसल्याने शहरातून तर तो केंव्हाच हद्दपार झाला आहे.मात्र आता गावाकडे वासुदेवाला पाहून मान सन्मान दिला जात आहे.आजही भारतीय संस्कृती जोपासली आहे.

## दुखवटा

### स्वाती टकले

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या, सोशल मीडिया सेलच्या अध्यक्ष



चित्रलेखा पाटील यांच्या मातोश्री स्वाती सतीश टकले यांचे सोमवार, दि. १० नोव्हेंबर रोजी पहाटेच्या सुमारास निधन झाले. निधनसमयी त्या ६५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

स्वाती टकले या नाशिकमधील रहिवासी होत्या. नाशिकमधील सोन्याचे प्रसिद्ध व्यापारी असलेल्या टकले ज्वेलर्सच्या त्या मालक होत्या. गृहिणीबरोबरच त्या एक उत्तम व्यावसायिक होत्या. सोमवारी पहाटेच्या सुमारास त्यांचे निधन झाले. त्याच दिवशी दुपारी साडेतीनच्या सुमारास नाशिक येथील अमरधाम स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, आदी उपस्थित होते

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकासनिधीतून
# आदई गावात रस्त्याचे कॉँक्रीटीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आदई गावामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या विकास निधीमधून अंतर्गत रस्त्याचे कॉँक्रिटीकरण करण्यात येणार आहे. या कामाचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी (दि.२४) झाले.

पनवेल विधानसभा मतदार संघात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे मार्गी लागुन नागरीकांना दिलासा देण्याचे काम होत आहे. त्यानुसार आदई गावामध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २० लाख रुपयांच्या विकास निधीमधून अंतर्गत रस्त्याचे कॉँक्रिटीकरण करण्यात येणार असून या कामाचे भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.



या वेळी भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील यांनी, भारतीय जनता पक्षाने विकासात्मक दृष्टीकोन समोर ठेऊन जनतेची सेवा करते, मात्र विरोधक हे फक्त थापा मारण्याचे काम करतात असे म्हणाले.

या कामाच्या भूमिपूजनावेळी भाजपचे पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, धर्माशेठ काकडे, महादू शेळके, भाई रामा पाटील, एकनाथ मोकल, जगदीश शेळके, विलास शेळके, आकाश मोकल, श्रीचन भंडारी, जनार्दन पाटील, मंगेश भोपी, पद्माकर शेळके, राजेश काकडे, रोहित पाटील, दीपक शेळके, राजेश शेळके, ज्ञानेश्वर पाटील, राहुल पाटील, एकनाथ शेळके, कैलास पाटील, किरण शेळके, अभिमन्यू भंडारी, मुकेश मोकळ, प्रशांत मोकल, सुरज म्हात्रे, संजय पारंगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी अभ्यासाला प्राधान्य देणे महत्त्वाचे -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



विद्यार्थ्यांनी आपण ज्या क्षेत्रात शिक्षण घेत आहोत, त्या ठिकाणी अभ्यासाला सर्वोच्च महत्त्व दिले पाहिजे, कारण हा महत्त्वाचा काळ परत येत नाही. त्यांनी विद्यार्थ्यांना अधिकाधिक शिक्षण घेण्याचा आग्रह करत, या स्पर्धेच्या युगात आपली हुशारी दाखवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खारघर येथे विद्यार्थी सत्कार समारंभावेळी केले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दहावी आणि बारावीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि मार्गदर्शन कार्यक्रम रविवारी खारघरमध्ये आयोजित करण्यात आला होता. हा सोहळा अजित अडसुळ आणि खारघर ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या उषा अडसुळ यांनी खारघर सेक्टर १५ मधील विबग्योर हायस्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांच्या हस्ते दहावी आणि बारावीच्या परिक्षेत उज्लव यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र आणि स्मार्टवॉच देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. तसेच डिंपल चौधरी या विद्यार्थीनीने तासाभरात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे तैलीचीत्र काढले असून या चित्राचे प्रकाशनदेखील त्यांच्या हस्ते झाले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मार्गदर्शन कराताना म्हणाले की, मेहनत आणि कष्ट हे महत्वाचे आहे. ज्या क्षेत्रातही शिक्षण घेत असाल या ठिकाणी अभ्यासाल महत्व द्या ही वेळ परत येत नाही. जेवढ शिक्षण घेता येईल तेवढ घ्या. विद्यार्थ्यांनी आपली हुशारी दाखवणे महत्त्वाचे आहे. सध्या स्पर्धेचे युग आहे. तुम्ही आतापर्यंत चांगल काम केले आहे यश चांगले मिळवले आहे. त्याच्या पुढील काळात यश मिळवण्यसाठी सज्ज रहा सतत मेहनत करा, असा सल्ला देत माझ्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अजित अडसूल आणि उषा अडसुळ यांचे आभअर मानले.

मोटीव्हेशन स्पिलर डॉक्टर राकेश सोमानी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शना बेसलाईन ते बेंचमार्क हा प्रवास आपल्याला करायचा आहे, असा महत्त्वाचा सल्ला दिला. विद्यार्थ्यांनी केवळ त्यांच्या वर्तमान क्षमतेवर समाधानी न राहता, सतत प्रयत्न करून, शिक्षणामध्ये आणि पुढील करिअरमध्ये उत्कृष्टता गाठण्याचे ध्येय ठेवले पाहिजे, असे सांगितले.

या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते जे.एम.म्हात्रे, मोटीवेश्नल स्कीपर डॉ. राकेश सोमाणी, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, समीर कदम, माजी नगरसेवक नरेश ठाकूर, उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष संतोष शर्मा, महिला मोर्चाच्या खारघर शहर अध्यक्षा साधना पवार, खारघर शहर मंडळ उपाध्यक्ष संजय घरत, अजित अडसुळ, उषा अडसुळ, शहर सरचिटणीस दीपक शिंदे, शहर सचीव फुलाजी ठाकूर, प्रभाग अध्यक्ष रामचंद्र पाटील, अजय माळी, तपासे सर, युवामोर्चाचे खारघर शहर अध्यक्ष नितेश पाटील, शुभ पाटील, नितेश कोळी, विकास हराळे, पंकज दाभोळे, सुनील पाठक, क्रिश माने, रमाकांत म्हात्रे आदी उपस्थित होते.



**कामोठे : येथे आदर्श सिंग यांनी सुरू केलेल्या हरीओम एंटरप्रायजेस या नवीन व्यवसायाच्या कार्यालयाचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी झाले. या वेळी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, शहर सरचिटणीस हर्षवर्धन पाटील, प्रभाग क्रमांक ११चे अध्यक्ष प्रदीप भगत, युवा मोर्चाचे कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह प्रदीप भगत युवा मंचाचे पदाधिकारी आणि सदस्य उपस्थित होते.**

## गव्हाण येथे व्यवसाय मार्गदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दहावीनंतर विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या विविध उपलब्ध संधी या विषयी रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज मध्ये समाधान लांडगे यांनी व्यवसाय मार्गदर्शन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.



सोमवार दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी संपन्न झालेल्या ह्या व्याख्यानप्रसंगी सरस्वती तंत्रशिक्षण विद्यालयाचे प्राचार्य प्रिं.डॉ.सुरुशे, मार्गदर्शक समाधान लांडगे, प्रदीप मुकादम, तांत्रिक सहाय्यक अक्षय यमगर, विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ वर्कर डी.के. म्हात्रे व ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले आदी मान्यवर उपस्थित होते.



**पनवेल :** जिल्हा परिषद शाळा बामणडोंगरी विद्यार्थी यांनी खेळामध्ये प्राविण्य मिळवावे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त शाळेचे चेअरमन अमर केसरीनाथ म्हात्रे यांच्याकडून कॅरम, बॅडमिंटन, चेस, सापशिडी, लगोरी, दोरी उडी, स्मायली बॉल, असे साहित्य देण्यात आले. या वेळी अमर म्हात्रे, प्रभाकर ठाकूर, अवधेश महतो, सुभाष नाईक, संतोष तुडमे, धनाजी खोत, हिराजी ठाकूर, चेतन ठाकूर, नवनाथ ठाकूर, जगदीश पाटील, कृष्णा सगदेवन, विश्वास ठाकूर, देवालय मित्रा, कपिल यादव, कुणाल गोंधळी, रतन कोळी, रतन ठाकूर, प्रभाकर पाटील आदी उपस्थित होते. सर्वांचे आभार मुख्याध्यापिका स्नेहलता यांनी मानले.



**कामोठे :** येथे कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि झेंडा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आगरी-कराडी कामोठे महोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. या महोत्सवाला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, आयोजक जय पावणेकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# ‘रयत’च्या कामोठे विद्यालयात शास्त्रज्ञांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मार्फत राबविल्या जाणाऱ्या गुरुकुल प्रकल्प अंतर्गत विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबत समाजातील यशस्वी व्यक्तींचे मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने बाह्य तज्ञ मार्गदर्शन आयोजित केले जाते. या उपक्रमांतर्गत शास्त्रज्ञ आपल्या भेटीला हा उपक्रम घेण्यात आला. यामध्ये रायगड जिल्ह्यातील पेण येथे राहणारे सध्या अमेरिकेमध्ये काम करणारे प्रज्ञेश चित्रा लक्ष्मण म्हात्रे यांनी विद्यालयाला भेट दिली.

प्रज्ञेश म्हात्रे यांनी २०२० मध्ये चार लघुग्रहांचा शोध लावून त्याचे युवा मध्ये रजिस्ट्रेशन केले आहे. २०२०मध्ये बेंगलोर तर्फे त्यांना युवा संशोधन म्हणून गौरविण्यात आले. त्यांनी २०२३ मध्ये सायंटिस्ट ॲस्ट्रोनॉट फॉर प्रोजेक्ट ही पदवी घेतली. त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेच्यामुळे नासा एल स्पेस अकॅडमी अँड प्रोजेक्ट पासून कार्यक्रमांतर्गत त्यांची निवड झाली आहे. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रज्ञेश मात्रे यांनी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील, सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील आणि लोकनेते दि.बा.पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागाचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगेरे यांनी विद्यालयाच्या वतीने यंग सायंटिस्ट प्रज्ञेश म्हात्रे व त्यांचे वडील लक्ष्मण म्हात्रे यांचा सत्कार केला. प्रास्ताविकामध्ये



त्यांनी शास्त्रज्ञ आपल्या भेटीला या उपक्रमाचे स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांना आवाहन केले की प्रज्ञेश म्हात्रे यांच्याकडून प्रेरणा घेऊन भविष्यामध्ये आपणसुद्धा अंतराळवीर होण्याचे स्वप्न पहावे.

प्रज्ञेश मात्रे यांनी आपला जीवन प्रवास सांगत असताना आपण कशाप्रकारे अभ्यास केला, एका छोट्याशा खेड्यातून ते थेट अमेरिकेतील नासा हा प्रवास करत असताना कोणकोणत्या समस्यावर कसा मार्ग काढला हे सांगितले. जिद्द व मेहनत आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी कशाप्रकारे मदत करतात हे विद्यार्थ्यांना विविध उदाहरणातून समजावून दिले. तसेच भविष्यात स्पेस इंडस्ट्रीमध्ये कशाप्रकारे विद्यार्थ्यांना काम करण्यासाठी संधी उपलब्ध असतील हेदेखील सांगितले.

या कार्यक्रमामध्ये विद्यालयातील श्रावणी घेरडे, श्रेयश घेरडे व कार्तिकी जाधव या विद्यार्थ्यांनी प्रज्ञेश म्हात्रे यांचे एक सुंदर चित्र रेखाटून त्यांना विद्यालयाकडून भेट म्हणून दिले. शेवटी विद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांनी विचारलेले विविध शंकांचे समाधान प्रज्ञेश म्हात्रे यांनी केले.

या कार्यक्रमाचे आयोजन गुरुकुल प्रमुख अनिल पाटील यांनी केले. या कार्यक्रमावेळी विद्यालयातील एम. डी. गावंड, एस. डी. पाटील, व्हि. व्ही.फडतरे, खुटले सर, गलांडे सर तसेच माजी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थ्यांचे क्युरॉसिटी कार्निवलमध्ये यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरतर्फे सायन्स मॅथ्स व एआय या विषयावर क्युरासिटी कार्निवल या नावाने प्रयोग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. ज्यामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल सीबीएससी उलवे मधील १६ विद्यार्थ्यांनी तीन ग्रुपमध्ये सहभाग नोंदविला होता.



ज्यामध्ये ग्रुप सीमधील जय कुकरेजा व हृदय गाणेकर इ. आठवी यांना मॅथ्स प्रयोगामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त झाला, प्रत्यक्ष कारिया व अखिल राणा इ. आठवी यांना विज्ञान प्रयोगामध्ये प्रथम क्रमांक प्राप्त झाला आणि ग्रुप ए मधील सिया महातो इ. पहिली व प्रियांश म्हात्रे इयत्ता दुसरी या विद्यार्थ्यांना विज्ञान प्रयोगामध्ये तृतीय क्रमांक प्राप्त झाला तसेच ग्रुप बी मधील सानवी बारापत्रे व स्वधा पांडे इ. ५वी या विद्यार्थिनींना मॅथ्स मध्ये तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

या सर्व विजेत्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना आयोजकांकडून सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र व रोख रक्कम या स्वरूपात बक्षिसे देण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षक यांचे स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी अभिनंदन केले व त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# श्री अनिरुद्ध उपासना केंद्रातर्फे रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

श्री अनिरुद्ध उपासना फाऊंडेशन, दिलासा मेडिकल ट्रस्ट व अनिरुद्ध केंद्र उरण व मुळेखंड वतीने उरण नगरपालिका, नानासाहेब धर्माधिकारी, शाळा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यात १७३ रक्तदात्यांनी उपस्थिती दर्शविली काही कारणास्तव २३ रक्तदात्यांचेरिजेक्ट करण्यात आले. सुमारे १५३ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

रक्तदात्यांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले. उरणचे आमदार महेश बालदी यांनी शिबिरास भेट देवून कार्यकर्त्यांचे कौतुक केले. प्रभाग क्रमांक ९चे उमेदवार सायली विशाल पाटेकर यांनीही भेट देवून सर्वांचे अभिनंदन केले.



# सीकेटी विद्यालयात आजी-आजोबांचा सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी प्राथमिक विद्यालयांमध्ये, पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागातर्फे सोमवारी (दि.२४) आजी-आजोबा दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला अनंत गोविंद कर्णे कर (प्रसिद्ध कीर्तनकार व प्रवचनकार), संगिता अनंत कर्णेकर हे आजी-आजोबा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर असे ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले.





मुख्याध्यापक मानकर सर यांनी प्रमुख पाहुण्यांचे शाल, श्रीफळ व नॅपकिन बुके देऊन स्वागत केले व उपस्थित विभाग प्रमुखांना श्रीफळ व नॅपकिन बुके देऊन स्वागत केले. तसेच उपस्थित सर्व आजी-आजोबांचे विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्प देऊन स्वागत केले.

आजी आजोबा दिनाचे औचित्य साधून पारितोषिक वितरणाचा सोहळा करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यालयाच्या संगीत शिक्षिका अर्चना मयूर पाटील यांनी आजी-आजोबांवरती गीत सादर केले. काही विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषण व आजी आजोबांबद्दल मनोगत व्यक्त केले. विद्यार्थिनींनी सुंदर नृत्य व वेशभूषा सादर करून सर्वांना मोहित केले. कार्यक्रमाच्या शेवटी अनंत कर्णेकर व हरिश्चंद्र शंकर वर्तक यांनी उपस्थित आजी-आजोबांना व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्यध्यापक सुभाष मानकर व पालक-शिक्षक संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक मंजिरी धोत्रे व प्रवीण पाटील यांनी केले. अशा प्रकारे आजी-आजोबा दिनाचा कार्यक्रम उत्साहात व आनंदात पार पडला.

## संपादकीय

# एका युगाचा अंत

साठच्या दशकापासून पुढची जवळपास पासष्ठ वर्षे आपल्या देखण्या व्यक्तिमत्त्वाने आणि निरनिराळ्या धाटणीच्या पण तितक्याच सहज भासणाऱ्या भूमिकांमधून चाहत्यांच्या मनातली आपली जागा कायम राखणारे हिंदी चित्रपट अभिनेते धर्मेंद्र यांचे सोमवारी वयाच्या ८९व्या वर्षी निधन झाले. गेली दोनएक वर्षे ते आताच्या तरुण पिढीच्याही चांगलेच परिचयाचे झाले होते. येत्या डिसेंबरमध्ये त्यांचा अखेरचा चित्रपट प्रदर्शित होईल. पण त्याआधीच धर्मेंद्रजींनी एक्झिट घेतली असून त्यांच्या जाण्याने एका युगाचा अंत झाल्याची भावना अनेकांकडून व्यक्त होते आहे.

**देश स्वतंत्र झाल्यानंतर तमाम देशवासियांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबित करत हिंदी सिनेमा बहरत गेला. साठच्या दशकात तर ब्लॅक अँड व्हाइट सिनेमाचे सुवर्णयुगच अवतरले. दिलीपकुमार, राज कपूर, देव आनंद यांसारखे प्रतिभावान आणि इतरही अनेक गुणी अभिनेते रुपेरी पडदा गाजवत असताना १९६० साली 'दिल भी तेरा हम भी तेरे' या चित्रपटातून धर्मेंद्र यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. पंजाबमधील साहनेवाल गावातील हा अत्यंत देखणा जाट तरुण आपल्या रूपाच्या जोरावर चित्रपटसृष्टीत नशीब आजमावण्यासाठी आला होता. त्याच्या हाती पहिले यश लागले ते १९६६च्या 'फूल और पत्थर' या सिनेमातून. देखणा, रोमँटिक हिरो रंगवणारे धर्मेंद्र त्या काळातील तरुणींना पुरती भुरळ घालून गेले. पंजाबी तरुणाला साजेशी आकर्षक देहयष्टी, तितकाच सुंदर चेहरा आणि या साऱ्याहूनही अधिक प्रेमात पाडणारा त्यांच्या व्यक्तिमत्त्वातला अस्सल सज्जनपणा त्यांना, पुढे काही सुपरस्टार अवतरले तरी एक हमखास प्रेक्षक खेचणारा 'डिपेंडेबल' अभिनेता बनवून गेला. त्यांच्या अभिनयाचे श्रेष्ठ दर्जाचा म्हणून वारेमाप कौतुक कधीच झाले नाही, परंतु त्यांनी रोमँटिक हिरोनंतर 'कुत्ते, मैं तेरा खून पी जाऊंगा' धाटणीच्या, व्हिलनची धुलाई करणाऱ्या रांगड्या भूमिकाही तितक्याच सहजतेने केल्या आणि अफलातून कॉमिक टाइमिंग दर्शविणाऱ्या विनोदी छटेच्या भूमिकाही. 'शोले'तल्या त्यांच्या 'वीरू'ने पाण्याच्या टाकीवर चढून 'सुसाइड, सुसाइड' ओरडत केलेला तमाशा असो की 'तुम्हारा नाम क्या है बसंती' सारखे संवाद असोत, हरतऱ्हेच्या भूमिकांमधून ते प्रेक्षकांच्या पसंतीस उतरत राहिले. त्यांच्या प्रदीर्घ कारकीर्दीत अनेक सुंदर अभिनेत्रींसोबत त्यांच्या वाट्याला असंख्य अवीट गोडीची गाणी आली. या गाण्यांमुळेही ते आज साठी-सत्तरीत असलेल्या प्रेक्षकांच्याच नव्हे तर त्याहून लहान प्रेक्षकांच्या मनातही आपले स्थान टिकवून राहिले. अलीकडेच २०२३ मध्ये करण जोहरच्या 'रॉकी और रानी की प्रेम कहानी'मध्ये धर्मेंद्र पुन्हा एकदा पडद्यावर अवतरले, ते शबाना आझमीसोबत 'अभी ना जाओ छोडकर, के दिल अभी भरा नहीं' हे अजरामर गीत गात. या गाण्यातून ते चक्क 'जेन-झी'शीही जोडले गेले आणि सोशल मीडियाच्या वापरातून, रिलिटी शोमधून पुन्हा-पुन्हा प्रेक्षकांसमोर येत आपल्या तरुणपणातील देखणेपणाच्या, सुंदर गाण्यांच्या आठवणी जाग्या करत राहिले. स्वप्नसुंदरी हेमामालिनीशी झालेला त्यांचा दुसरा विवाह त्याकाळी प्रचंड गाजला होता. दोन भिन्न व्यक्तिमत्त्वांच्या पत्नींसोबतची दोन्ही कुटुंबे त्यांनी अतिशय प्रेमाने जपली आणि जोडली. पंजाबी असल्याने शेतकऱ्याचे मातीसोबतचे नातेही तितक्याच प्रेमाने सांभाळले. एक अतिशय सज्जन, प्रेमळ, कुटुंबवत्सल माणूस असेच त्यांचे वर्णन सोमवारी चित्रपटसृष्टीतील सारे आदराने करताना दिसले. देहाने 'धरमपाजी' काळाच्या पडद्याआड गेले असले तरी, कित्येक सुमधुर गाण्यांमधून, 'वीरू'सारख्या अजरामर व्यक्तिरेखेतून ते असंख्य चाहत्यांच्या मनात पुढची कैक वर्षे राहणारच आहेत.**

# शेती क्षेत्रातील यशस्वी, प्रेरणादायी प्रवास



काही माणसे दिसायला अतिशय साधी सरळ स्वभावाची असतात. त्यांच्या वागण्यात कमालीची विनम्रता असते, परंतु ती माणसे अतिशय हुशार आणि प्रामाणिक असतात.असेच एक हुशार व्यक्तिमत्त्व म्हणजे आदिती थिटे उर्फ तुळसा ठाकूर.

रायगड जिल्ह्यातील व रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावात एका शेतकरी कुटुंबात तिचा जन्म झाला.आदिती थिटे चे लग्नापूर्वीचे नाव तुळसा.तुळसा टोळू ठाकूर. तुळसा ही लहानपणापासून दिसायला गोंडस व तरबेज बुद्धीची तसेच प्रत्येक बाबतीत हजरजबाबी. एका शेतकरी कुटुंबात जन्माला आली असल्याने लहानपणापासून तिला आपल्या परिस्थितीची पुरेपूर जाणिव.आणि याच जाणिवेतून आई-वडीलांना शेतीच्या कामात मदत करून उरलेला वेळ काढून जास्तीत जास्त अभ्यास कसा करता येईल यासाठी तिचे प्रयत्न असायचे.म्हणून तर प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असताना ती नेहमीच अभ्यासात सर्वांच्या पुढे असायची.इयत्ता चौथी पर्यन्तचे शिक्षण आपल्या गावात पुर्ण झाल्यावर पुढे हायस्कूल शिक्षणासाठी गावापासून तीन किमी अंतरावर असलेल्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे प्रवेश घेतला.त्यावेळी रस्ते चांगले नव्हते की शाळेत जाण्यासाठी कोणतीही व्यवस्था नव्हती.अशा परिस्थितीत दररोज येऊन जाऊन सहा किमीचा प्रवास व्हायचा.इयत्ता पाचवीला प्रवेश घेतल्यापासून तिथेही ती अभ्यासात कुठेही कमी पडली नाही.तर अभ्यासाबरोबरच विद्यालयातील सर्वच स्पर्धा व उपक्रमात ती नेहमीच अग्रेसर असायची.त्यावेळी तिला शिकविणारे शिक्षक बी.पी.म्हात्रे सर,जंगम सर,माळी सर, मरवडे सर,म्हात्रे मॅडम व थिटे सर यांच्या सान्निध्यात शिकत असताना त्यांच्या विचारांचा व शिकविण्याचा प्रभावही तिच्यावर पडला.त्यातून ती पुढे घडत गेली. शाळा,शाळेतील स्पर्धा व उपक्रम तसेच घरातील व शेतीची कामे करत असताना ती कुठेही कमी पडली नाही.शेवटी दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल लागला.परीक्षेत चांगले गुण मिळविले.दहावी नंतर विविध क्षेत्र पुढील करिअरसाठी तिला खुणावत होते,परंतू म्हणतात ना परिस्थितीपुढे कोणाचेही काहीही चालत नाही.आणि नेमके तिच्या बाबतीतही तसेच झाले.परिस्थिती आड आली आणि पुढे खुप शिकून सवरून मोठे होण्याचे तिचे स्वप्नं अर्धवटच राहिले.

पुढे कालांतराने तिच्याच गावात तिचे शेतकरी कुटुंबात लग्न झाले.सासरही शेतकरी असल्याने शेतीची आवड तिला स्वस्थ बसू देत नव्हती.आपण परिस्थितीमुळे शिकलो नाही म्हणून काय झाले.शेतीमध्येच आपले करिअर करायचे या उद्देशाने आपल्या मिस्टरांना विश्वासात घेऊन शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध प्रयोग करायला सुरूवात केली. मिस्टरांची व सासरच्या मंडळींनी दिलेली साथ यामुळे तिला खुप आत्मविश्वास मिळाला आणि याच आत्मविश्वासाच्या बळावर शेती हेच आपले सर्वस्व समजून शेतीमध्ये मेहनत घेऊ लागली.

कृषीनिष्ठ बाहे गाव म्हणजे रायगड जिल्ह्यातील ताज्या भाजीपाल्याचे पीकासाठी प्रसिद्ध गाव.त्यामुळे येथील शेतकरी वर्गाने पिकविलेल्या भाजीला दररोज बाजारपेठत मोठी मागणी.भाजीपाल्याचे पीक घेत असताना शेतीमध्ये केवल एकच भाजी न पिकविता जास्त मागणी कोणत्या भाजीला आहे,त्या भाजी पिकांचे लागवडीचे तंत्रज्ञान तसेच अधिक पीक मिळावे यासाठी आपल्याला काय केले पाहिजे याचा ती बारकाईने अभ्यास करू लागली व त्या पद्धतीने नवनवे प्रयोग करून शेतीतील उत्पादन कसे वाढेल यासाठी प्रयत्न करू लागली.सुरूवातीला नवनवीन प्रयोग करताना खुप अडचणी यायच्या अशावेळी ती थोडीच हार मानणारी नव्हती.तर पुन्हा नव्या उमेदीने व आत्मविश्वासाने आपण कुठे कमी पडलो यांचा अभ्यास करून शेतीमध्ये जीव ओतून काम करू लागली.याकामी तिला तिच्या मिस्टरांची नेहमीच साथ लाभली.याशिवाय तालुका कृषी विभागातील अधिकारी वर्ग यांनीही वेळोवेळी चांगले सहकार्य केले.

शेतीमध्ये अविरत मेहनत घेत असतानाच शेती क्षेत्राच्या तिच्या करिअरला खरी कलाटणी मिळाली ती २०२१/२२ या वर्षामध्ये.पुणे,बीड व नगर जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेल्या आलेल्या शेतकरी कृषी अभ्यास दौऱ्यातून तिला खुप काही शिकायला मिळाले.त्या अभ्यास दौ-यात प्रत्यक्षात तिथले शेतकरी व शेती शेती,त्यांनी शेतीमध्ये केलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व उत्पादन वाढीसाठी केलेले प्रयोग हे सारे पहायला मिळाले.त्या अभ्यास दौ-यात खुप काही शिकायला मिळाल्यानंतर कधी एकदा आपल्या गावी जाऊन शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करते असे तिला वाटत होते. आणि खरोखरच अभ्यास दौरा करून आल्यावर क्षणाचीही उसंत न घेता झपाट्याने कामाला लागली. पंखात नवे बळ प्राप्त झाल्यानंतर पक्षी ज्या प्रमाणे आकाशात उंचच उंच विहार करतो. अगदी त्याच पद्धतीने नव्या उमेदीने ती कामाला लागली.नेहमीच्या भाजीपाल्याचे पिकांबरोबरच तिने कलिंगडाचीही लागवड करून तो प्रयोगही यशस्वी करून दाखवला.त्यासाठी तिने स्वतः शेणखत, कंपोस्ट खत,गांडुळ खत,कोकोपीट यासारखी ऑर्गेनिक खतांचा वापर केला, जीवामृत स्वतः तयार केले.शेती क्षेत्रातील या सुयशाबद्दल श्री.विवेकानंद ट्रेनिंग अँड इन्स्टिट्यूट सेंटर रोहाच्या वतीने प्रगतशील महिला शेतकरी म्हणून एका कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.तर २०२३ मध्ये तालुक्यातील बळीराजा शेतकरी प्रतिष्ठान यांच्या वतीनेही आदर्श महिला शेतकरी म्हणून विशेष सन्मान करण्यात आला.तसेच १५ ऑक्टोबर २०२३ रोजी महिला किसान दिनानिमित्त आत्मा योजनेअंतर्गत प्रगतशील शेतकरी महिला म्हणून गौरविण्यात आले.

सन २०१९पासून उमेद अंतर्गत महिलांचे बचत गट यशस्वीपणे चालविल्यानंतर यामध्ये अधिक दुधशर्करा योग म्हणजे सन २०२२ मध्ये बिजामृत फार्मर प्रोड्यूसर या कंपनीने स्थापन केलेल्या गावातील महिला बचत गटाचे अध्यक्षपद भूषविण्याची व बिजामृत फार्मर प्रोड्यूसर या कंपनीत डायरेक्टर पदावर काम करण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली.

शेतीमध्ये अधिक प्रयोग करून सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती हे प्रयोग यशस्वी करून दाखवले.तर विविध सामाजिक संस्था तसेच शासकीय कार्यशाळा व शेतकरी शिबिर येथे आयोजित शेतकरी प्रशिक्षण वर्गातून शेतीविषयक माहिती व अभ्यास करून त्याचा फायदा स्वतः तर करत आहेत.याशिवाय इतर शेतकरी वर्गालाही त्याबाबत माहिती देण्याचे त्यांचे काम अविरतपणे चालू आहे.

शालेय जीवनापासून नेतृत्व करण्याची आवड असल्याने व जिल्हा व तालुका स्तरावर संपन्न होणारे विविध सामाजिक कार्यक्रम तसेच शेतकरी मेळाव्यातून सहभाग घेऊन त्या मेळाव्यात शेती व शेतकरी वर्गाचे प्रश्न प्राधान्याने मांडत आहेत.तर मार्च २०२५ ला पुणे गोखले नगर येथे संपन्न झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील पशूधनासंबंधी संपन्न झालेल्या १७ दिवसीय पशूसखी या निवासी शिबिरात सहभागी होऊन पशूधनासंबंधी अधिक माहिती संपादित करून पशूसंवर्धन क्षेत्रातही कार्यरत आहेत.त्या अंतर्गत विविध बारामती येथील केव्हिके केंद्रांना भेटी देऊन त्याचाही उपयोग पशूधन क्षेत्रात करत आहेत.याशिवाय इतरांनाही त्याबाबत मार्गदर्शन करीत आहेत.तर बारामती येथील केव्हिके अंतर्गत भेटी दरम्यान त्यांचे शेती क्षेत्र,पशूधन व वक्तृत्व शैलीवर प्रभावित होऊन तेथील एका कार्यक्रमात त्यांचा विशेष गौरवही करण्यात आला आहे.

अशा प्रकारे अभ्यासात हुशार असून देखील परिस्थितीमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही.याचे शल्य मनात कुठेतरी बोचत असतानाच व ती खंत मनात असतानाच वडीलोपार्जित शेती क्षेत्राला आपले करिअर मानून व मनामध्ये कुठलाही न्यूनगंड न बाळगता आदिती अशोक थिटे उर्फ तुळसा टोळू ठाकूर यांनी एक महिला असून शेती क्षेत्रात केलेली कामगिरी ही खरोखरच समाजासमोर प्रेरणादायी ठरत आहे.व महिला कुठेही कमी पडत नाहीत. अगदी कष्टाचे शेती क्षेत्र असले तरी. हेच त्यांनी दाखवून दिले आहे.

**– राजेंद्र जाधव,** रोहा

## बदलते तंत्रज्ञान

# गुगल पेवर कॅशबॅकसाठी वापरा 'या' ट्रिक्स




गेल्या काही दिवसांपासून गुगल पेमेंट मिळणारे भरघोस कॅशबॅक बंद झाल्याने ग्राहक नाराज झाले आहेत. त्याचप्रमाणे मिळणारे रिवॉर्ड्सही फारसे वापरले जात नसल्याने अनेकजण गुगल पे आता वापरायचे की नाही या विवंचनते आहेत, पण गुगल पेमेंट वापरूनही तुम्हाला कॅशबॅक रिवॉर्ड मिळत नसेल, तर आज आम्ही तुम्हाला असे काही मार्ग सांगणार आहोत, ज्याद्वारे ही समस्या दूर होईल आणि तुम्ही प्रत्येक पेमेंटवर कमाई करू शकता.


तुम्हाला जी-पेवर मोठा कॅशबॅक मिळवायचा असेल, तर त्यासाठी तुम्हाला एक महत्त्वाची टिप फॉलो करावी लागेल. खरेतर तुम्ही पेमेंट करता तेव्हा वेगवेगळ्या नंबरवर पैसे देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा तुम्ही एकाच नंबरवर पेमेंट करता, तेव्हा कॅशबॅक जिंकण्याची शक्यता खूपच कमी असते. त्यामुळे वेगवेगळ्या खात्यांवर पैसे पाठवा आणि कॅशबॅक मिळवा.

गुगल पेमेंट करताना तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की, एकाच वेळी खूप मोठे पेमेंट पाठवण्याऐवजी त्याचे छोटे विभाग करून दोन किंवा तीन वेळा पाठवा. असे केल्याने कॅशबॅक रिवॉर्ड मिळण्याची शक्यता जास्त आहे.

आपण सर्वांनी गुगल पेवर विविध प्रकारचे कुपन पाहिले असतीलच. जर तुम्हाला चांगल्या कॅशबॅकचा लाभ घ्यायचा असेल तर ही कुपन नक्कीच खरेदी करा आणि मग तुम्हाला चांगला कॅशबॅक मिळेल आणि तुम्ही हजारो कमवू शकाल.

रिचार्ज केल्यानंतरही तुम्ही कॅशबॅक जिंकू शकता, त्यामुळे जेव्हा तुम्हाला तुमच्या फोन, ब्रॉडबँड किंवा डीटीएचसाठी पैसे द्यायचे असतील तेव्हा ते फक्त गुगल पेने पैसे पाठवा. याद्वारे तुम्ही कॅशबॅक जिंकू शकता. गुगल पेमेंटवर अनेक गेम आणि ऑफर थोड्या अंतराने सुरू होतात. जर तुम्हाला कॅशबॅकचा लाभ घ्यायचा असेल, तर त्यात सहभागी, व्हा जेणेकरून तुम्ही पेमेंट दरम्यान जास्तीत जास्त कमाई करू शकता.

# नाट्यतपस्वी भालचंद्र पेंढारकर



## निमित्त


भालचंद्र व्यंकटेश पेंढारकर ऊर्फ अण्णा पेंढारकर हे मराठी रंगभूमीवरील एक श्रेष्ठ नाट्य-अभिनेते, दिग्दर्शक, नाट्य-निर्माते आणि नेपथ्यकार होते. त्यांचा जन्म २५ नोव्हेंबर १९२१ रोजी हैदराबादमध्ये झाला. भालचंद्र पेंढारकर अर्थात अण्णा हे अत्यंत व्यासंगी, शिस्तबद्ध आणि रंगभूमीवर अमाप श्रद्धा असणारे रंगकर्मी होते. ते मेहनतीला कोठेही कमी पडत नसत. जेव्हा बालपणी त्यांनी निश्चय केला की आपल्याला गाणं शिकायचंय, त्यासाठी रात्रीचा दिवस केला. त्यांची आजी व आई त्यांना बापूराव पेंढारकरांच्या मृत्यूनंतर जेव्हा मुंबईला घेऊन आली, तेव्हा बापूरावांच्या चाहत्यांनी 'पेंढारकर ट्रस्ट' उभा केला.

अण्णांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी सांगितलं. त्या वेळी त्यांनी फक्त औपचारिक शिक्षण घेण्यास नकार दिला. त्यांना संगीताचं शिक्षण घ्यायचंच होतं. त्यांच्या आजी व आईनं त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. रोज सकाळी ५ ते ८ रियाज, मग पर्वतीवर व्यायाम, १० ते १२ शिकवणी, जेवण, पुन्हा संध्याकाळी ३ ते ८ शिकवणी. मग रात्री कुठेतरी गाण्याचा कार्यक्रम ऐकायला जायचं असं पाच वर्षं सुरू होतं. ते दिवस खूप आर्थिक चणचणीचे होते. घरी आजी, आई आणि तीन लहान बहिणी. त्यातील दोन अपंग व अण्णा. एकच धोतर होतं त्यांच्याकडे. ते रात्री धुवायचे, पंचावर निजायचे अन् दुसऱ्या दिवशी पहाटे वझेबुवांकडे पळायचे. हेही दिवस सरले. रेडिओच्या कामानिमित्ताने बाबुराव देसाई यांची भेट झाली. त्यांना अण्णांची स्थिती समजली. देसाईंनी संपूर्ण कुटुंबासह अण्णांना मुंबईत आपल्या घरी राहायला बोलावलं. 'ललितकलादर्श'चं पुनरुज्जीवन करायला लावलं आणि त्यासाठी संपूर्ण आधार दिला.

ललितकलादर्श या नाट्यक्षेत्रातील प्रतिष्ठित संस्थेचे प्रमुख या नात्याने त्यांनी अनेक संगीत नाटके रंगभूमीवर सादर केली. त्यात 'संगीत सौभद्र'सारखी पूर्वी गाजलेली नाटके होतीच, शिवाय 'पंडितराज जगन्नाथ', 'दुरितांचे तिमिर जावो', 'बावनखणी', 'जय जय गौरीशंकर', 'आनंदी गोपाळ' या नव्या नाटकांचाही समावेश होता. अभिनयासोबतच दिग्दर्शन, नेपथ्य, छायाचित्रण, नाट्य निर्मिती अशा अनेक क्षेत्रांत पेंढारकर लीलया वावरले. गिरगावच्या साहित्य संघातील त्यांचा वावर अनेक कलावंतांना मार्गदर्शक ठरला.

पेंढारकर यांनी संगीत, गद्य अशा सुमारे ५१ नाटकांमध्ये भूमिका केली होती. त्यांनी ललितकलादर्श संस्थेमार्फत १४ नाटकांची निर्मिती केली. विजय तेंडुलकर लिखित 'झाला अनंत हनुमंत', भारत-चीन युद्धाच्या पार्श्वभूमीवरील 'रक्त नको मज प्रेम हवे' हे सुरेश खरे लिखित नाटक तसेच डॉ. आनंदीबाई जोशी यांच्या जीवनावरील 'आनंदी-गोपाळ' ही त्यातील काही प्रमुख नाटके होती. पेंढारकर यांच्यावर ग्वाल्हेर गायकीचे संस्कार झाले होते. 'आई तुझी आठवण येते', 'जय जय गौरीशंकर' नाटकातील 'रमारमण श्रीरंग' ही त्यांच्या संगीत नाटकातील पदे अतिशय लोकप्रिय झाली. १९५५मध्ये प्रदर्शित 'अमर भूपाळी' चित्रपटात होनाजी यांची भूमिका पंडित नगरकर तर बाळा यांची भूमिका भालचंद्र पेंढारकर यांनी केली होती. अशा या नाट्यतपस्वीचे ११ ऑगस्ट २०१५ रोजी निधन झाले.

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर



# थंड झालेला चहा पुन्हा गरम केल्यास होतात 'हे' परिणाम

आपल्यापैकी अनेकजणांना सकाळी उठल्या उठल्या चहा हा लागतोच. चहाची तल्लफ असलेले बरेच सापडतील आपल्याला. अस्सल चहाबाज चहासाठी कायम टपरीवरच्या चहाला पसंती देतात, परंतु अनेक लोक चहा बनवण्यात आळस करतात. ज्यामुळे एकदाच मोठ्या प्रमाणात चहा बनवून ठेवतात आणि तो वेळोवेळी गरम करून पितात, परंतु वारंवार गरम करून चहा प्यायल्याने आरोग्याचे मोठे नुकसान होते. त्यामुळे चहा वारंवार गरम करून पिऊ नये. जाणून घेऊया तयार झालेला चहा पुन्हा गरम करून का पिऊ नये...

**आरोग्यासाठी हानिकारक** : एकदाच तयार केलेला चहा पुन्हा पुन्हा गरम करून पिणे आरोग्यासाठी घातक आहे कारण त्यात असलेले पोषक तत्त्व नष्ट होतात. जर तुम्ही ही सवय बदलली नाही तर बराच वेळानंतर पोटदुखी, जळजळ होऊ शकते. ही सवय तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे. त्यामुळे पुन्हा पुन्हा चहा गरम पिणे टाळणे योग्य ठरेल.

**चव आणि वाईट वास** : चहा पुन्हा पुन्हा गरम केल्याने त्याची चव आणि सुगंध नष्ट होतो. या दोन्ही गोष्टी चहामध्ये खास आहेत. याशिवाय चहा पुन्हा पुन्हा गरम केल्याने त्याचे पोषक घटकही कमी होतात.

**जीवाणूंची वाढ** : एकदाच चहा तयार करून पुन्हा पुन्हा पिणे आरोग्यासाठी हानिकारक आहे कारण चहामध्ये सूक्ष्मजीव तयार होऊ लागतात. हे सौम्य जीवाणू आरोग्यासाठी हानिकारक असतात. ज्या घरांमध्ये दुधाचे प्रमाण जास्त असते तेथे दुधाचा चहा बनवला जातो. यामुळे सूक्ष्मजीव धोका वाढतो. त्याचवेळी हर्बल चहा वारंवार गरम केल्याने त्याचे पोषक घटक नष्ट होतात.

**टॅनिन बाहेर निघून जाते** : जर तुम्ही चहाप्रेमी असाल, तर तुम्हाला चवीत कोणतीही तडजोड आवडणार नाही पण जर तुम्ही चहा बराच काळ तसाच ठेवला तर ते टॅनिन सोडते, ज्यामुळे चहाची चव पूर्णपणे कडू होते. अशावेळी चहा तुमच्या तोंडाची चवदेखील खराब करेल.

# चौकमध्ये महावितरणकडून वीज बिल वाटपाचा घोळ

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या चौक येथील कार्यालयातून वीज बिल वाटपाचा घोळ सुरूच आहे, त्यामुळे बिले न भरण्याचा इशारा व्यापारी असोसिएशन चौक यांनी दिला आहे.



गेले काही महिन्यापासून महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ यांच्या मार्फत ग्राहकांना देण्यात येणाऱ्या वीज बिल हे ग्राहक यांच्या पर्यंत न पोहचल्याने चौक परिसरातील वीज ग्राहक यांना त्रास आणि आर्थिक भुर्दंड पडत आहे, वेळेत वीज बिल न भरल्याने वीज पुरवठा खंडित करण्यासाठी कर्मचारी हजर होतात, मात्र बिले देण्याचे काम आमचे नाही, असे आवर्जून सांगत आहेत.मात्र त्याची दखल घेताना कोणीही अधिकारी दिसत नाही. वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे, मग अधिकारी व कर्मचारी कुठे काम करतात? असा प्रश्न व्यापारी असोसिएशन चौकचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांनी विचारला आहे.

पूर्वी वीज वितरण कंपनी मार्फत अधिकृत कर्मचारी यांच्या कडून वीज ग्राहक यांना वीज बिले देण्यात येत होती, पण गेली काही वर्ष विद्युत मीटर रिडिंग आणि वीज बिल वितरणाचे काम खाजगी संस्था यांना देण्यात आल्याने वीज बिल वाटपाच्यात प्रचंड घोळ सुरू असून वेळेवर रिडिंग होत नाही, आणि त्याचा परिणाम उशिरा बिल वाटण्यात होत असल्याने वीज बिल भरण्यास ग्राहकांना उशीर होतो, त्याचा फटका ग्राहकांना बसून विलंब आकार भरावा लागत असल्याने आर्थिक नुकसान होतच आहे, शिवाय उशिरा बिल भरल्याने वीज पुरवठा खंडित करण्यासाठी वीज वितरण कंपनी यांच्या कर्मचारी यांच्याकडून वीज पुरवठा खंडित करण्यात येतो. त्याचाही फटका ग्राहक यांना बसत आहे.

बिलाचे वाटप वेळेवर न झाल्यामुळे त्याचा फटका सर्वसामान्य ग्राहकांना बसत आहे. त्यामुळे स्थानिक अधिकारी यांनी वीज बिल भरण्यासाठी ग्राहक यांना मुदत वाढ द्यावी अशी मागणी चौक परिसरातून होत आहे.गेले काही दिवस वारंवार वीज पुरवठा खंडित होत आहे, मात्र तो वेळेवर दुरुस्त होत नाही, पण एक दिवस वीज बिल भरण्यासाठी उशीर झाला तर, वीजपुरवठा खंडित केला जातो

चौक परिसरातील वीज बिल वाटपाचे काम एका खासगी संस्थेला दिले आहे, मात्र त्यांचे कर्मचारी हे वेळेवर रिडिंग घेत नाहीत,त्यामुळे वीज बिल वाटपाचे काम होत नाही, मात्र वीज बिल भरण्यासाठी उशिरा झाला तर वीज पुरवठा खंडित केला जाणार नाही, असे चौकचे कनिष्ठ अभियंता देसाई यांनी सांगितले. सद्या चौक कार्यालयात वीज बिलांचे गठ्ठे येऊन पडले आहेत, मात्र त्याचे व्यवस्थापन कुणी करायचे असा प्रश्न निर्माण झाला आहे.

# ग्रामस्थांच्या रेट्यामुळे खालापूर नगरपंचायत प्रशासन झुकले!

## घरपट्टीवाढीसंदर्भात विचारविनिमय

**खालापूर : प्रतिनिधी**



खालापूर नगरपंचायत कार्यालयात सोमवार दि २४ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष रोशनी मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम तसेच स्वीकृत नगरसेवक शिवानी जंगम व सुप्रिया साळुंखे यांच्या उपस्थितीत खालापूर नगरपंचायत हद्दीतील नागरिकांची बैठकीत घरपट्टी वाढीसंदर्भात विचारविनिमय करण्यात आला.

या बैठकीत झालेल्या चर्चेत सर्वानुमते खालापूर नगरपंचायतीने घरपट्टी कर वाढीचा ठराव रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. या लोक निर्णयानुसार घरपट्टी वाढीव संदर्भातील ज्या हरकती/ आक्षेप सादर करायचे होते, त्यांची आवश्यकता नसल्याने ग्रामस्थांनी आनंद साजरा केला.

याबाबतची संपूर्ण कारवाई नव्याने करण्यात येणार असल्याचे खालापूर नगरपंचायत प्रशासनाने बैठकीत सांगितले, तर नगरपंचायत येत्या दोन दिवसांत अधिकृत जाहीर सूचना प्रसिद्ध करणार असल्याचे सांगितले.

# अलिबागमध्ये उमेदवारांचा डिजिटल प्रचारावर भर

**अलिबाग : प्रतिनिधी**

नगरपरिषदांच्या निवडणूकीत अपक्ष उमेदवारांना अद्याप चिन्ह मिळालेले नाही. त्यांना २६ नोव्हेंबर रोजी चिन्ह मिळणार आहे. त्यामुळे अपक्ष उमेदवारांना प्रचारासाठी केवळ पाच दिवस मिळणार आहेत. राजकीय पक्षांच्या उमेदवारांना चिन्ह मिळाली आहेत. त्यांनी आपला प्रचार सुरू केला आहे. अशांना चिन्हाचा प्रचार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. अनेकांनी डिजीटल प्रचारावर भर दिला असून त्यातसाठी सोशल मिडियासारख्या प्रभावी माध्यरमांचा वापर केला जात आहे. अपक्ष उमेदवारांचा प्रचाराने अद्याप वेग घेतला नसल्यामुळे प्रचारात अद्याप अपेक्षित रंगत आलेली नाही.

नगरपरिषद निवडणुकीत अर्जाच्या छाननीनंतर नामांकन मागे घेण्याची प्रक्रिया २१ नोव्हेंबरपर्यंत चालली. २५ नोव्हेबरपर्यंत अपिलाचा कालावधी देण्यात आला. रायगड जिल्ह्यात १० नगरपालिकांमध्येद नगरसेवकाच्या २१७ जागेसाठी ५७५ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. तर नगराध्यक्षाच्या १० जागांसाठी ३४ उमेदवार भवितव्य आजमावत आहेत.जे अपक्ष निवडणूक लढवत आहे त्यांना चिन्हाचा प्रचार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे. प्रमुख पक्षाचे उमेदवार १७ नोव्हेंबरपासूनच प्रचाराला लागले आहेत. त्यांनी आपल्या प्रभागांमध्ये घरोघरी जाऊन जाहीर प्रचार सुरू केला आहे. या तुलनेत अपक्षांना मात्र फार कमी कालावधी मिळणार आहेत. अपक्षांना २६ नोव्हेंबर रोजी चिन्ह देण्यात येणार आहे.



(संग्रहित छायाचित्र)

मिळालेल्या चिन्हाचा प्रचार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण झाली आहे . चिन्हानुसार प्रचार साहित्य घेवून मतदारापर्यंत जाण्यासाठी अपक्ष उमेदवारांना केवळ पाच दिवसांचा कालावधी मिळणार आहे. हा खूपच कमी असल्या ने उमेदवार जास्ती जास्त मतदारांपर्यंत पोहाचण्याअसाठी प्रयत्नांची शिकस्त करीत आहेत. अनेकांनी डिजीटल प्रचारावर भर दिला असून त्यातसाठी सोशल मिडियासारख्या प्रभावी माध्यरमांचा वापर केला जात आहे. उमेदवार आणि त्यांरचे समर्थक सकाळी लवकर आणि संध्यांकाळी घरोघरी फिरून प्रचार करताना दिसत आहेत.

प्रचार परवानगीसाठी नगरपरिषदेत एक खिडकी सुरू करण्यात आली आहे. मात्र, तेथील अर्जासोबत पोलिसांकडून मिळालेले नाहरकत प्रमाणपत्र जोडावे लागते. असे अर्ज पोलिस ठाण्यात मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. उमेदवारांना आयोगाच्या निर्देशानुसार प्रचार करण्यासाठी वाहन परवाना, लाऊड स्पीकर परवाना, सभा-मेळावे यासाठी परवानगी, प्रचार कार्यालय उघडण्यास परवानगी, रॅलीची परवानगी, रोड शोसाठी परवानगी, मैदानाचा वापर करण्यास परवानगी घ्यावी लागणार आहे.

प्रमुख राजकीय पक्षांनी मोठया किंवा स्टार प्रचारकांच्या सभा घेण्या चे टाळले आहे. आतापर्यंत पेणमध्येर २६ नोव्हेंबर रोजीची उपमुख्य मंत्री एकनाथ शिंदे यांची सभा निश्चित झाली आहे. इतर कोणत्याही नेत्यांच्याल सभा अद्यापही ठरलेल्या नाही. शेवटच्या टप्यात अलिबागमध्ये महायुतीकडून आशिष शेलार, नितेश राणे यांच्याय सभा, रॅलीचे नियोजन आहे.

# सामूहिक श्रमदानातून गावविकासाला नवी दिशा




**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

## रानवली येथे आदर्श उपक्रम

मौजे रानवली ग्रामस्थांनी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' फक्त कागदावर न ठेवता, लोकसहभागाच्या बळावर प्रत्यक्षात उतरवले असून, गावाने विकासाच्या दिशेने महत्त्वाची झेप घेतली आहे. ग्रामपंचायतीच्या । महाश्रमदान उपक्रमात जवळपास १५० ते २०० ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवून गावाचा चेहरामोहरा बदलून टाकला.

एकाच दिवशी झालेल्या या उपक्रमात ग्रामस्थांनी अनेक महत्वाची कामे पूर्णत्वास नेली. कायद्याच्या चौकटीत राहून व सार्वजनिक हित लक्षात ठेवून करण्यात आलेली प्रमुख कामे अशी कि, गावातील सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. कचरा निर्मुलन व परिसराची स्वच्छता करून गावाचे सौंदर्य वाढविण्यात आले. अनेक ठिकाणी खराब झालेल्या अंतर्गत रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करून वाहतुकीची अडचण दूर करण्यात आली. शेतीकडे जाणाऱ्या मार्गांची निर्मिती व दुरुस्ती करून शेतकऱ्यांच्या दैनंदिन अडचणींना मोठा दिलासा देण्यात आला.

या श्रमदानात ग्रामपंचायत सरपंच सुरेश मांडवकर, उपसरपंच आताऊल्ला जळगावकर यांच्यासह सदस्य समीर पोपळकर, भाविका जोशी, विठोबा हावरे, आयुब खान, लियाकत विजापुरी, विजय गजमल, शीतल धामणकर यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कामात भाग घेतला. यावेळी गावातील महिला, सर्व समाजांचे अध्यक्ष, शाळेचे शिक्षक, तसेच ग्रामपंचायत अधिकारी अभिजित माने आणि मुख्याध्यापक भिकू पांगारकर यांच्यासह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

रानवली ग्रामस्थांनी केवळ श्रमदान केले नाही, तर 'माझे गाव, माझी जबाबदारी' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवली आहे. गावविकासात लोकसहभाग किती प्रभावी ठरू शकतो, याचा आदर्श नमुना रानवलीने जिल्ह्यासमोर ठेवला आहे. ही मोहिम केवळ एक उपक्रम नसून, समृद्ध, पारदर्शक आणि आदर्श पंचायतीच्या दिशेने रानवलीने टाकलेले ठोस पाऊल आहे.

# सदगुरू श्री अनिरुद्ध उपासना ट्रस्टच्या शिबिरात ७७ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सद्गुरू श्री अनिरुध्द उपासना ट्रस्टच्या वतीने समर्पण रक्त केंद्र घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७७ जणांनी रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी कर्जत, खालापूर तालुक्यात आयोजित केलेले हे ५२८ वे रक्तदान शिबीर ठरले.

श्री शनी मंदिराच्या रवि किरण सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री अनिरुध्द बापूंना अभिवादन करून रक्तदान शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी मंगेश गांवकर, शिरीष दिघे, नितीन देशमुख, गणेश राऊत, सुभाष पाटील, हेमंत सुरावकर, सुनिल शिंदे, सुनिल पवार, समीर कारुळकर, विमल डागा, मनिषा देशमुख, लता कुलकर्णी, प्रतिभा देशमुख, कविता शिंदे, नीला घेवारे, उषा दिवेकर, स्वरुपा बदले आदी उपस्थित होते. सर्वप्रथम उत्पल देशमुख यांनी रक्तदान करून रक्तदानाचा शुभारंभ केला. शिरीष दिघे, त्यांच्या सौभाग्यवती सुमन दिघे, कन्या जुई दिघे-राऊत व पुत्र राज दिघे या एकाच कुटुंबातील सदस्यांनी रक्तदान करून रक्तदानाची परंपरा कायम ठेवली.



# खोपोलीत नगर परिषद निवडणुकीत चुरस वाढली

**खोपोली : प्रतिनिधी**




खोपोली नगरपालिका निवडणूक अत्यंत चुरशीची बनली आहे. शिवसेना शिंदे गट-भाजप-आरपीआय अशी महायुती आणि राष्ट्रवादी अजित पवार गट-राष्ट्रवादी शरद पवार -शेकाप आणि शिवसेना ठाकरे गट यांची एकत्रित परिवर्तन विकास आघाडी यांच्यात अत्यंत अटीतटीची लढत होत आहे. थेट नगराध्यक्षपदासाठी महायुतीकडून कुलदीपक शेंडे विरुद्ध परिवर्तन विकास आघाडीचे डॉ. सुनील पाटील यांच्यात थेट लढत होत आहे .

तसेच १५ प्रभागातील ३१ नगरसेवक पदासाठी बहुसंख्य ठिकाणी महायुती विरुद्ध परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांत अत्यंत चुरशीची लढत होणार आहे. शिवसेना-भाजप व रिपाई या महायुतीचे नगराध्यक्षचे उमेदवार कुलदीप शेंडे आता तरी प्रचारात आघाडीवर असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे

पहिल्या टप्प्यात दोन्ही पातळीवर पारडे समान असून, परिवर्तन विकास आघाडीकडून प्रचार व निवडणूकीची सर्व सूत्रे प्रदेश अध्यक्ष व खासदार सुनिल तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा अध्यक्ष सुधाकर घारे व अन्य वरिष्ठ नेते यांनी त्यांच्याकडे घेतली असून , कोणत्याही परिस्थितीत नगराध्यक्ष व पंधराच्यावर नगरसेवक निवडून येण्यासाठी सुधाकर घारे व परिवर्तन विकास आघाडीकडून प्रभाग निहाय आखणी सुरू आहे.

दरम्यान, परिवर्तन विकास आघाडीतील उबाठाची नाराजी संपुष्टात आल्याने परिवर्तन विकास आघाडीच्या उमेदवारांसाठी हा मोठा दिलासा मिळाला आहे.

खोपोली नगरपालिका निवडणुकीत परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार डॉ सुनिल पाटील व प्रतिस्पर्धी महायुतीचे उमेदवार कुलदीपक शेंडे या दोन्ही उमेदवारांची जनमानसातील प्रतिमा चांगली आहे. त्यांना मानणारा मतदार व समाज घटकही समान टक्के आहे. त्यामुळे निवडणूक निकाल बाबत कोणताही ठोस अंदाज बांधणे शक्य होत नसल्याने खोपोलीतील निवडणूक अत्यंत चुरशीची बनली आहे. स्थानिक प्रभागातील उमेदवारांचे बळाचे पारडे जिकडे जड होईल

त्या बाजूने खोपोलीच्या नगराध्यक्ष पदाचा निवडणूक निर्णय लागू शकतो. अशी स्थिती खोपोलीत बनली आहे. २५ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर या सात दिवसांत प्रचाराचे नियोजन व अत्यंत महत्वाचे म्हणजे शेवटच्या दोन दिवसांतील तुल्यबळ आर्थिक गणित ज्याचे सुनिश्चित, त्याकडे येथील निवडणूक निर्णय झुकण्याची शक्यता अधिक बनली आहे.

# माझी शाळा माझा अभिमान अंतर्गत माजी विद्यार्थी मेळावा

**पाली : प्रतिनिधी**

रा. जि. प शाळा बेणसे येथे माझी शाळा माझा अभिमान अंतर्गत माजी विध्यार्थी मेळावा अगदी यशस्वीरित्या संपन्न झाला. या मेळाव्यास माजी विद्यार्थी उद्धव कुथे, , ह. भ. प श्री. संजय पांढरे, श्री. यशवंत कुथे, श्री. दिनेश कुथे,श्री. अनिल गोरे, श्री मुसावीर मोमीन, श्री. बशीर मांढरे, श्री राजेश गोरे, सौ. सुरेखा कुथे आदिसह असंख्य माजी विध्यार्थी या मेळाव्यास उपस्थिती होते.

सामाजिक बांधिलकी आणि समाजभान दाखवून आपण ज्या शाळेत शिकलो ज्या शाळेमुळे आपल्या जीवनात बदल झाले, जगायला शिकवलं तीच काहीतरी देणं लागतो हे सांगून माजी विद्यार्थ्यांनी अनेक शालोपयोगी वस्तू शाळेला भेट दिल्या.

या शाळेत शिकलेले अनेक विद्यार्थी आज मोठं मोठ्या हुद्यावर सन्मानाच्या जागेवर कार्यरत आहेत. ही कृतज्ञता बाळगून माजी विद्यार्थ्यांनी लवकरच शाळेच्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक बाबी यांची पूर्तता आम्ही नक्की करू असं आश्वासन दिलं गेलं.

मेळाव्याचे नियोजन ग्रामपंचायत बेणसे आणि शाळा बेणसे यानी केले होते. उपस्थित मान्यवरांचे शाळेचे मुख्याध्यापक संतोष धुमाळ, शिक्षिका सुचिता आंब्रे, सरिता म्हात्रे शिक्षक वृंद यांनी केले.




## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मऔविम

ई निविदा सूचना क्रमांक ६३/२०२५-२०२६ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोलादपूर येथील सावित्री धरण परिसराची साफसफाई, गवत कापणे, बागबगीच्याची वार्षिक तत्वावर देखभाल करण्याकरीता मनुष्यबळ, यंत्रसामग्री इत्यादी पुरविणे. | ₹ १४,१५,२५४.०० |
| २ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा औद्योगिक क्षेत्रातील टप्पा- २ संपपासून सामाईक सांडपाणी प्रक्रिया केंद्रापर्यंत पर्यंत तळोजा भूखंड क्र. के-१२ जवळील सांडपाणी संकलन एचडीपीई वाहिनीचा जुना खराब झालेला भाग तातडीने बदलणे. | ₹ १५,६८,८५४.०० |
| ३ | पाताळगंगा येथील जुनी पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... जुन्या जलशुद्धिकरण केंद्रातील व जलउदंचन केंद्रातील विविध व्हॉल्व्हची दुरुस्ती व सर्व्हिसिंग करणे. | ₹ ४०,२९,७५२.०० |
| ४ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.... तळोजा फीडर जलवाहिनी, जलवितरण प्रणाली व मुख्य जलवाहिनीवरील गळती शोधणे व गळती बंद करण्यासाठी मनुष्यबळ व यंत्रसामग्री १ (एक) वर्षाच्या कालावधीसाठी पुरवणे. | ₹ ३९,१६,६५७.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक २५/११/२०२५ ते दिनांक ०९/१२/२०२५ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २८/११/२०२५ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०३/१२/२०२५ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# अनेक विकासाची कामे आपल्या परिसरात होतील -अरुणशेठ भगत

## चिखले येथे तीन कोटींच्या कामांचे भूमिपूजन आणि जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनात पार्टी ही दिलेला शब्द पाळणारी पार्टी आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली अनेक विकासाची कामे आपल्या परिसरार होतील, अशी ग्वाही भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी चिखले येथे सुमारे तीन कोटी रुपयांच्या विकास कामांच्या भुमीपूजन आणि जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनावेळी दिली.

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकास कामांचा झंझावात सुरू आहे. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रयत्नांमुळे चिखले गावात अनेक विकासाची कामे मंजुर झाली असून त्यांचे सोमवारी भुमीपूजन तसेच भारीय जनता पार्टीच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन झाले.

या वेळी एक कोटी ८६ लाख रुपयांच्या निधीमधून चिखले फाटा ते मोहो या ३.५ किलोमीटर रस्त्याचे डांबरीकरण, ५० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथे अंतर्गत गल्ली व रस्ते काँक्रीटीकरण, २० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथे वॉर्ड क्रमांक २ मध्ये नवीन विद्युत ट्रान्सफार्मर, १३ लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथे नवीन व्यायाम शाळा, ११ लाख २५ हजार रुपयांच्या निधीमधून चिखले येथे नवीन अंगणवाडी, १० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथे जिल्हा परिषद शाळेची दुरुस्ती, १० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथील गणपती विसर्जन घाटाचे सुशोभीकरण आणि १० लाख रुपयांच्या निधीमधून चिखले येथील नदीला संरक्षण भिंत बांधण्यात येणार आहे.

या कामांच्या भुमीपूजनावेळी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र पाटील, पनवेल पूर्व मंडळ अध्यक्ष भुपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, युवामोर्चा अध्यक्ष योगेश लहाने, माजी सरपंच नामदेव पाटील, माजी उपसरपंच रमेश गडकरी, भाजप युवामोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, रविंद्र गडकरी, बुथ अध्यक्ष गणेश पाटील, सदस्य अविनाश पाटील, मानसी शेळके, वर्षा पंडित, रेणुका चौधरी, नामदेव कान्हा पाटील, नामदेव पदू पाटील, गोमा पाटील, विजय धांग्रेकर, अरुल पाटणकर, दत्तात्रेय पाटणकर, संजय गडकरी, संजय शेळके, जगदिश बढे, जयदास म्हात्रे, निलेश शेळके, धीरज गडकरी, मिलींद शेळके, विनोद पंडित, संदिप पंडित, रविंद्र मेढेकर, विश्वास मेढेकर, दत्तात्रेय गायकर, प्रसाद गायकर, शांताराम शेळके, स्वप्नील पाटील, दत्तात्रेय गडकरी, भालचंद्र पाटील, दिनेश पाटील, मच्छिंद्र पाटील, सुर्यकांत पाटील, निलेश भोपी, ग्रामविकास अीधकारी काळे मॅडम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डीआरआय अधिकारी असल्याचे भासवून १६ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महसूल गुप्तचर संचालनालय म्हणजेच डीआरआय विभागातील वरिष्ठ अधिकारी पदावर असल्याचे भासवून पनवेलमध्ये एका व्यक्तीने सहा जणांना नोकरी लावतो म्हणून तब्बल १६ लाख ४४ हजार ४९९ रुपयांची फसवणूक केली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नेरूळ येथे राहणाऱ्या २८ वर्षीय तरूणाने दिलेल्या ऑनलाईन तक्रारीनंतर नवी मुंबई पोलिसांनी गुन्हा नोंद केला. पनवेल शहर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यामध्ये पनवेल शहरातील पनवेल प्लाझा या कॉ.ऑप. सोसायटीतील व्यक्तीने ही फसवणूक केली आहे. मागील वर्षी फेब्रुवारी महिन्यात या फसवणूकीची सुरूवात झाली.

फसगत झालेला तरूण भारतीय पोस्ट विभागात कंत्राटी कामगार आहे. कायम स्वरूपी नोकरी मिळावी यासाठी त्याच्या काही ओळखीच्या व्यक्तीने पनवेलमधील या व्यक्तीचे नाव सूचविले होते. पनवेल शहरातील पनवेल प्लाझा या इमारतीमध्ये या व्यक्तीचे कार्यालयात सुरूवातीला तरूणाची भेट झाली. स्वता डीआरआय विभागात वरिष्ठ पदावर आणि त्याचे सहकारी कॅप्टन असून ते मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी लावतात अशी दोघांची ओळख करून या तरूणाचा




विश्वास संपादन केला. सरकारी कार्यालयात किंवा महाराष्ट्र सिक्युरीटी बोर्डात कामाला लावण्यासाठी ७० हजार रुपयांची मागणी केली.

नोकरी लागणार असल्याने या तरूणाने ७० हजार बँकेच्या बचत खात्यातून वळते केले, मात्र १० महिने नोकरी न लावत असल्याने वारंवार संपर्क केल्यावर त्यांना मुंबई येथील मंत्रालयाजवळ बोलावले. मंत्रालयाच्या सूरक्षा रक्षकाच्या केबीनमध्ये एका अधिकाऱ्यासोबत या नोकरी मिळण्यासाठी पाठपुरावा करणा-या तरूणाची ओळख करून देण्यात आली या अधिकाऱ्यानेही नोकरीसाठी प्रयत्न करतो असे या तरूणांना सांगीतले. त्यामुळे अजून विश्वास बसला, मात्र अनेक महिने नोकरी लागत नसल्याने या तरूणाने दिलेल्या ७० हजार रुपयांची परत देण्याची मागणी केली. त्यावेळी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याने संशय वाढला.

अखेर आपल्याप्रमाणे इतर पाच तरूणांची फसवणूक झाल्याचे समजले. यामुळे या सहा तरूणांनी नवी मुंबई पोलीस विभागाच्या गुन्हे शाखेचे उपायुक्त सचिन गुंजाळ यांच्याकडे अर्ज केला. या अर्जाची सखोल चौकशी केल्यावर पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत नूकतीच गुन्हा नोंदविण्यात आला.

सातारा जिल्ह्यातील औंध येथील ३० ते ३२ वर्षीय तरूणाने इतरांना नोकरी लावतो असे भासवण्यासाठी पनवेलच्या सोसायटीमध्ये भाड्याने ऑफीस घेणे आणि मंत्रालयातील सूरक्षा रक्षकाच्या केबीनमध्ये तरूणांना नोकरी मिळेल, असे आश्वासन देणे इथपर्यंत विविध व्यक्ती गुंतल्यामुळे या प्रकरणाची पाळेमुळे अजून खोल असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या प्रकरणात अजून किती तरूणांची अजून किती लाख रुपयांची फसवणूक झाली यासाठी पोलिसांना अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे.

## तळोजात गार्डनमध्ये नागरी सुविधांची कामे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा परिसरातील सेक्टर १४ येथील गार्डनमध्ये नागरिकांच्या सोयीसाठी सुलभ शौचालय उभारण्याच्या कामाला अखेर प्रत्यक्ष सुरूवात झाली आहे. पनवेल महानगरपालिकेच्या वतीने हे काम हाती घेण्यात आले असून, भाजप उत्तर मंडळ उपाध्यक्ष निर्दोष केणी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा प्रश्न मार्गी लागल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सेक्टर मधील उद्यानात दररोज मोठ्या प्रमाणात ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुले सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, व्यायामासाठी आणि मनोरंजनासाठी भेट देत असतात. परंतु गेल्या अनेक महिन्यांपासून उद्यान परिसरात सुलभ शौचालयाची कमतरता भासत होती. यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता.

नागरिकांच्या या समस्येची दखल घेत भाजपा उत्तर मंडळ उपाध्यक्ष निर्दोष केणी यांनी पनवेल महापालिकेकडे वारंवार पाठपुरावा करून तातडीने



शौचालय उभारणीची मागणी केली होती. संबंधित विभागाशी सातत्याने चर्चा, पत्रव्यवहार व बैठका घेतल्याने अखेर कामाचे आदेश देण्यात आले.

सोमवारी या कामाचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी नागरिकांनी समाधान व्यक्त करत निर्दोष केणी यांचे आभार मानले. नागरिकांच्या सोयी-सुविधांना प्राधान्य देत पुढील काळात तळोजामध्ये आणखी गरजेच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ते करतील, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

## पनवेल महापालिकेच्या अक्षय ऊर्जा प्रोत्साहन उपक्रमाचा शुभारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत पनवेल महापालिकेमार्फत 'अक्षय ऊर्जा प्रोत्साहन' उपक्रमाचा उत्साहात शुभारंभ सोमवारी (दि.२४) रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर येथे करण्यात आला. आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात येत असलेल्या या उपक्रमाचा उद्देश नागरिकांमध्ये, विद्यार्थ्यामध्ये अक्षय ऊर्जेचे महत्त्व, ऊर्जा संवर्धन, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि हरित उपक्रमांविषयी जनजागृती निर्माण करणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत पर्यावरण विषयावर आधारित निबंध लेखन, पोस्टर बनविणे, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, पॅनेल चर्चा, तज्ज्ञ चर्चा, यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची भावना दृढ करण्यासाठी ई-वेस्ट संकलन मोहिम, लघुपट प्रदर्शन आणि वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

माझी वसुंधरा अभियानांतर्गत उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार होत असलेल्या या उपक्रमांच्या शुभारंभावेळी शाळेच्या प्राचार्य निशा नायर व शाळेचे शिक्षकवृंद उपस्थित होते. दिनांक २४ नोव्हेंबर व २५ नोव्हेंबर असे दोन दिवस हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये अक्षय ऊर्जेचा वापर वाढविणे, हरित ऊर्जेचे महत्व अधोरेखित करणे आणि पर्यावरण रक्षणासाठी सामूहिक सहभाग घडवून आणणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

ऊर्जा वाचवा - पर्यावरण वाचवा हा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला असून, रामशेठ ठाकूर मराठी मिडीयम स्कूल ओवेपेठ येथेही या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

## प्रा. श्रीरंजन आवटे यांचे विचारप्रवर्तक व्याख्यान

**नवी मुंबई : बातमीदार**

अमृतमहोत्सवी संविधान पर्वाच्या अनुषंगाने संविधान दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात प्रसिद्ध लेखक, व्याख्याते प्रा.श्रीरंजन आवटे यांनी 'नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले संविधानातील मूलभूत हक्क' या विषयावरील उद् बोधक व्याख्यानातून 'भारतीय संविधानाचा आत्मा' म्हणून बाबासाहेबांनी संबोधलेल्या संविधानातील २२ विभागांपैकी तिसऱ्या अत्यंत महत्त्वाच्या विभागातील कलम १२ ते ३५ उलगडून सांगितले.

नवी मुंबई महानगरपालिकेने उभारलेले बाबासाहेबांचे अप्रतिम स्मारक पाहून मी भारावून गेलो असे सांगत प्रा. श्रीरंजन आवटे यांनी स्मारकातील




विविध दालनांना भेटी देताना टाईम मशीनमध्ये बसून बाबासाहेबांसोबत चालतोय असा अनुभव आल्याचे कथन केले. शिक्षण विभागाच्या उपायुक्त तथा भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या प्रमुख संघरत्ना खिल्लारे यांनी महापालिकेच्या वतीने व्याख्यात्यांचे स्वागत केले. या वेळी स्मारकाच्या सल्लागार संध्या अंबादे उपस्थित होत्या.

आपल्या व्याख्यानामध्ये प्रा.श्रीरंजन आवटे यांनी संविधानाची निर्मिती ही तीन ते चार वर्षात झाली असली तरी त्या पाठीमागे १५० हून अधिक वर्षांची परंपरा असल्याचे सांगत, संविधानात अशी चिरंतन मूल्ये आहेत जी पुसता येणार नाहीत असे मत व्यक्त केले. 'उद्देशिका ही संविधानाचे ओळखपत्र' या नाना पालखीवाला यांच्या विधानाचा उल्लेख करीत 'समाजाचा जीपीएस स्वप्न नकाशा' म्हणजे संविधान असा वेगळा विचार त्यांनी मांडला. उद्देशिका समजली की भारतीय संविधानाचे व्याकरण समजते असे सांगताना भारतातील लोकांनी स्वतःला हे संविधान अर्पण केले आहे त्यामुळे लोकांची जबाबदारी मोठी असल्याचे ते म्हणाले. काय नाकारायचे हे बाबासाहेबांनी सांगितलेच त्यासोबतच काय स्वीकारायचे हे पण त्यांनी सांगितले. विषमतेला नकार व समतेला होकार हे बाबासाहेबांचे विचार आपण समजून घेत नाही म्हणून पुन्हा पुन्हा संविधान समजून घेण्याची गरज भासते असे मत प्रा.आवटे यांनी व्यक्त केले.

इतिहासातील विविध दाखले देत, संविधानातील मूल्यांची वेगवेगळ्या उदाहरणांतून मांडणी करत संविधानातील विविध कलमांच्या पाठांतरापेक्षा त्या पाठीमागचा आशय समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. व्याख्यानाच्या विषयाच्या अनुषंगाने संविधानातील मूलभूत हक्काविषयी १२ ते ३५ कलमांच्या माहितीची उदाहरणासहित मांडणी त्यांनी केली.

## आपटा येथील शाळेत वह्यांचे वाटप



**रसायनी : प्रतिनिधी**

आपटा येथील मराठी जिल्हा परिषद शाळेमध्ये सोमवारी (दि.२४) गरीब गरजू मुलांना वह्यांचे वाटप केले गेले. या वहया वाशिवली तळवली येथील बिर्ला कार्बन कंपनीच्या सीआरएस फंडातून त्यांचे अधिकारी लक्ष्मण मोरे यांनी या वह्या दिल्या होत्या.

आपटा येथील पत्रकार बी एस कुलकर्णी यांच्या हस्ते व शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक हसुराम पाटील व इरफान यांच्या हस्ते सर्व मुलांना या वह्यांचे वाटप करण्यात आले.

बिर्ला कार्बन कंपनी या भागामध्ये विविध शाळांमध्ये शालेय वस्तू चे व ज्या वस्तूची गरज आहे त्या मुलांना अशा वस्तू आणि इतर शालेय गोष्टींची वाटप करत असते. त्याबद्दल शाळेच्या वतीने तळवली येथील बिर्ला कार्बन कंपनीचे अधिकारी लक्ष्मण मोरे यांचे शाळेने आभार मानले.

## घाटमाथ्यावरील मेंढपाळ कोकणात दाखल

**उरण : प्रतिनिधी**

दरवर्षी घाटमाथ्यावरून कोकणाकडे मेंढपाळीसाठी घाटमाथ्यावरून ऑक्टोबर महिन्याच्या प्रारंभी येणारा धनगर यंदा परतीच्या पावसाच्या वाढत्या ओघामुळे आपली मेंढरे घेऊन कोकणाकडे दाखल होतांना नोव्हेंबरचा शेवटचा सप्ताह लागला आहे.

उरण तालुक्यातील चिरनेर - कळंबूसरे रस्त्यावरून या धनगर मेंढपाळ करण्यासाठी आपली मेंढरे घेऊन आले आहेत. मेंढपाळ करणारा धनगर समाज या विभागातील प्रत्येकाच्या परिचयाचा असून, पोटाची खळगी भरण्यासाठी शेकडो मैल प्रवास करीत कोकणात येतो. विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर तशीच स्थिती या मेंढपाळांची निर्माण झाली आहे. आपल्या सोबत आपली मुले, आणि मेंढ्या घेऊन मिळेल तिथे मुक्काम करणे, हे वर्षानुवर्ष चालत असलेले गणित



असून, यामुळे मुलांच्या शिक्षणाची परवड होत आहे.

आपल्या लहान मुलांना घोड्यावर बसवून, रणरणत्या उन्हाची आणि थंडीची तमा न बाळगता, त्यांचा प्रवास मे. महिन्याच्या अखेरीपर्यंत सुरूच असतो, मात्र असे असले तरीसुद्धा दरवर्षी मेंढपाळ मोठ्या प्रमाणावर आपला लवाजमा घेऊन, कोकणात दाखल होत असतात. सोबत असतात ती घोडी आणि याच घोड्यांच्या वरती थाटत असतो तो संसार. मिळेल तिथे वस्ती आणि आकाश हेच छप्पर. शेती हेच त्यांचे अंगण. अशा स्थितीमध्ये जीवन जगणारे मेंढपाळ तालु- तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहेत. पाऊस गेला की कोकणात अनेक जण पोटाची खळगी भरण्यासाठी येत असतात. त्यापैकी असलेला मेंढपाळ हा मिळेल तिथून मार्ग काढत, हा समाज तालुक्यातील बहुतांश भागात मेंढपाळांनी व्यापलेला पहावयास मिळत आहे.

कोकणात पावसाच्या पाण्यावर अनेक प्रकारच्या काटेरी वनस्पती वाढलेल्या असतात. या काटेरी वनस्पती पासून मेंढ्यांना सकस आहार मिळत असतो. शिवाय या खाद्यामुळे दूध व्यवसाय तेजीत चालतो. सध्या कोकणामध्ये औद्योगिकरण मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे हवे तसे खाद्यपदार्थ उपलब्ध होत नाहीत. शिवाय मेंढ्या आजारी पडण्याचे प्रमाणही वाढले आहे. त्याचबरोबर पाण्याची आणि वाहतुकीची समस्या गंभीर बनत चालली आहे. मेंढ्या घाट माथ्यावरून घेऊन येणे म्हणजे मोठ्या जिकरीचे काम असते. मात्र तसे असले तरी पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या या व्यवसायाला खंड पडू नये, यासाठी मेंढपालन करण्याचा व्यवसाय आम्ही करतो, असे मत एका मेंढपाळ यांनी व्यक्त केले.

## 'शिवसंकल्प'तर्फे रामचंद्र म्हात्रे विद्यालयास ब्ल्यूटूथ स्पीकर

**उरण : बातमीदार**

शिवसंकल्प समालोचक असोसिएशन च्या वतीने रामचंद्र विद्यालय आवरेला ब्ल्यू टूथ स्पीकर प्रदान आणि असोसिएशन ची जर्सी अनावरण असा दुहेरी कार्यक्रम रामचंद्र म्हात्रे विद्यालय, आवरे येथे पार पडला.

कार्यक्रमासाठी ज्यांच्या माध्यमातून स्पीकर साठी धनराशी देण्यात आली असे ज्येष्ठ समाजसेवक मनोहर पाटील (माऊली) वहाळ, तसेच ज्यांच्या माध्यमातून असोसिएशन च्या ३३ सभासदांच्या अंगावर जर्सी रुपी वस्त्रालंकार देण्यात आला.

युवा उद्योजक नंदकुमार गावडे (भोम), रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शिवप्रेमी प्रा. शिक्षक कौशिक ठाकूर, असोसिएशनचे अध्यक्ष नितेश पंडित, उपाध्यक्ष श्याम ठाकूर, सचिव सुनिल वर्तक, खजिनदार जिवन डाकी, सहसचिव विद्याधर गावंड, स्वप्नील पाटील, पिंट्या घरत, मनीष चिर्लेकर आदी



सदस्य आणि विद्यालयाचे सर्व शिक्षकवर्ग आणि कॉलेज विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

पाहुण्यांचे स्वागत शिक्षक शेखर पाटील यांनी तर प्रास्ताविक असोसिएशनचे सचिव सुनिल वर्तक यांनी आणि अध्यक्ष नितेश पंडित यांनी असोसिएशन च्या कार्याचा विस्तृत लेखाजोगा मांडताना पुढील ध्येय धोरण विषद केले. शेवटी मनोहर पाटील यांचे चिरंजीव उत्तम तबला वादक केवल पाटील यांच्या वाढदिवसा निमित्ताने सर्व विद्यार्थ्यांना फळे वाटप करून विद्याधर गावंड यांनी सर्वांचे आभार मानले.

# एक्सप्रेस वेवर चार वाहनांचा अपघात

## भरधाव कंटेनरची पीकअप, ट्रक आणि कारला धडक ▌ एक जण ठार, दोघे जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवर पहाटे एका भरधाव वेगात जाणाऱ्या कंटेनरने समोरील पिकअप, ट्रक आणि कारला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला. यात कंटेनरच्या केबिनमध्ये चालक अडकून त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोघे जखमी झाले.

मुंबई-पुणे एक्सप्रेसवरून कंटेनर (एमएच ४६ एएफ ००८४) हा चालक रियाज अहमद (वय ३६, रा. अँटॉप हिल, मुंबई) हा घेऊन जात असताना तो बोरघाटातील आडोशी येथील नवीन बोगद्याजवळ आला असता चालकाचे कंटेनरवरील नियंत्रण सुटल्याने त्याने समोरील समोरील पीकअप (एमएच ०६ बीडब्ल्यू ६३९१) याला पाठीमागून जोरदार धडक दिली तर पीकने त्याच्या समोरील ट्रक (एमएच ०९ इएम ९९५४) याला जोरदार धडक दिली तर ट्रकने त्याच्या समोरील चालणाऱ्या टाटा पंच कार (एमएच ०३ बीएफ ६३०३) हिला जोरदार धडक दिल्याने अश्या एकूण चार वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे.

यात कंटेनरच्या केबिनमध्ये अडकून चालक रियाज अहमद याचा जागीच मृत्यू झाला तर पीकमधील चालक आणि प्रवाशी हे दोन जण जखमी झाले आहेत. त्यांना तत्काळ बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. या अपघातात चारही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या अपघाताची माहिती मिळताच बोरघाट महामार्ग पोलीस, हेल्प फाउंडेशनचे सदस्य, आयआरबी टीम, खोपोली पोलीस स्टेशनची टीम, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, आदी तत्काळ घटनास्थळी दाखल होत कंटेनर आणि पीकअपमध्ये अडकलेल्या चालकाला बाहेर काढले.

# बोरघाटात टेम्पो-कार अपघातात तिघे जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**



जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाटात मेकॅनिक पॉईंटजवळ कार आणि टेम्पो अपघात तीन जण किरकोळ जखमी झाले या अपघातात कारने पेट घेतल्याने खोपोली अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण करण्यात आले.

घटनास्थळी दाखल असणाऱ्या वाहन चालकांनी फोमच्या साह्याने आगीवर नियंत्रण मिळवले. आर बी पेट्रोलिंग, डेल्टा फोर्स, महामार्ग वाहतूक पोलीस, खोपोली पोलीस स्टेशनची यंत्रणा, हेल्प फाऊंडेशनचे मेंबर्स मदत करून जखमींना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल केले. औटी कुटुंब जुन्नर आळेफाट्या येथून नवी मुंबई घणसोली येथे निघाले होते.

ही घटना दुपारी १ वा सुमारास घडली. जखमींची नाव पिनल औटी (वय ३७), सार्थक औटी (वय १३), संदीप औटी (वय ४०) अशी आहेत.

# रोह्यात भाजप-शिंदे शिवसेना युतीच्या प्रचाराला दमदार सुरुवात

**धाटाव : प्रतिनिधी**



रोहा-अष्टमी नगर परिषद निवडणुकीत भाजप-शिवसेना (शिंदे गट) युतीने प्रभाग क्रमांक ९ मध्ये रविवारी सकाळी जोरदार शक्तिप्रदर्शनासह प्रचाराचा शुभारंभ केला. प्रभाग ९ अ मध्ये शिवसेना (शिंदे गट) यांच्या सुप्रिया अनंत जाधव, तर प्रभाग ९ ब मध्ये भाजपचे रोशन विष्णु चाफेकर यांनी घराघरांत जाऊन मतदारांना भेट देत प्रचार मोहीम सुरू केली. या वेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शिल्पा धोत्रे यांना मतदान करण्याचे आवाहन युतीच्या पदाधिकाऱ्यांनी नागरिकांना केले.

कार्यक्रमास भाजप रोहा तालुकाप्रमुख अमित घाग, शिवसेना शहरप्रमुख मंगेश रावकर, उमेदवार रोशन चाफेकर, सुप्रिया जाधव, श्रद्धा पडवळ, पी. व्ही. सनीलकुमार, निलेश वारंगे, ॲड. सार्थक जाधव, ज्योती सनीलकुमार, अनिल घरजाळे, परेश चितळकर, राकेश चाफेकर, रिया कासार यांसह युतीचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक ९ मध्ये भाजप-शिंदे शिवसेना युतीची राष्ट्रवादी काँग्रेसविरुद्ध थेट लढत होत असून, प्रचाराच्या पहिल्याच दिवशी 'काटे की टक्कर' अशी परिस्थिती असल्याचे स्पष्ट झाले आहे. मागील पाच वर्षांत प्रभागात संघटन सातत्याने मजबूत केल्याने युतीच्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वासही वाढलेला दिसून आला.

भाजपचे उमेदवार रोशन चाफेकर म्हणाले, प्रभागात अनेक वर्षे लोकप्रतिनिधी नसतानाही आम्ही सातत्याने सर्वसामान्यांसाठी काम केले आहे. त्यामुळे या वेळी जनता बदल घडवणार, याचा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. भाजप-शिवसेना ही नैसर्गिक युती असून विकास हा आमचा मुख्य अजेंडा आहे.

सुप्रिया जाधव व रोशन चाफेकर यांचा जोमदार संपर्क दौरा युतीचे दोन्ही उमेदवार सकाळपासून घरदारी संपर्क मोहिमेत व्यस्त असून, प्रभागातील महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांशी संवाद साधत स्थानिक प्रश्नांची माहिती घेत आहेत. पुढील काही दिवसांत प्रचाराला आणखी गती देऊन मतदारांपर्यंत पोहोचण्याची रणनीती आखण्यात आली आहे. तर प्रभाग क्रमांक ९ मध्ये युतीच्या प्रचाराला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता निवडणुकीची चुरस अधिक रंगणार, असे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# भारतीय सशस्त्र सैन्य दलात अधिकारीपदाचे मोफत प्रशिक्षण

**रायगड : रामप्रहर वृत्त**

भारतीय सैन्यादल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Service Selection Board (SSB) या परीक्षेची पूर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी १५ ते दि.२४ डिसेंबर २०२५ या कालावधीत SSB कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात येत आहे. प्रशिक्षणार्थींनी केंद्रामध्ये पोहोचण्याची तारीख १४ डिसेंबर २०२५ सकाळी १० वाजता राहील. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना निःशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

रायगड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्या दलातील अधिकारी पदाची संधी लाभ घेण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय रायगड अलिबाग येथे १३ डिसेंबर २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येतेवेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करून त्यामधील SSB - ६४ कोर्ससाठी (किंवा संबधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयानें प्रिंट दिलेल्या प्रवेश पत्र व त्यासोबत असलेली परिशिषटांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे

एस.एस.बी.वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी कंम्बाईड डिफेंस सव्हीसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेंस अँकेडमी बोड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी उ सर्टिफिकिट - किंवा इ ग्रेडमध्ये पास झालेले असावेत. व एनसीसी ग्रुप हेडक्कवार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस एस बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे यापैकी कोणतीही एक पात्रता असणे आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना सोबत घेवून यावेत.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई-मेल आय डी training.petenashikgmail.com, pctcoicyahoo.in व दुरध्वनी क्रं.०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉटसअप क्रं. ९१५६०७३३०६ वर कार्यालयील वेळेत प्रत्यक्ष अथवा दुरध्वनीवर संपर्क करावा, असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग यांनी केले आहे.

# ग्रामीण भागात एसटी वाहतूक व्यवस्था ढासळली

## माणगाव एसटी आगारात प्रवाशांची धडक; व्यवस्था सुरळीत करण्याचे आश्वासन

**माणगाव : प्रतिनिधी**



माणगाव तालुका-रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण. तालुक्यातील शेकडो खेड्यांचा जगण्याचा प्रमुख आधार असलेली एसटी बस सेवा आज गंभीर संकटातून जात आहे. चालक-वाहकांची मोठ्या प्रमाणात रिक्त पदे, डेपोचे वाढते आर्थिक नुकसान आणि त्यातून निर्माण झालेला प्रवाशांचा संताप या सर्वांचा परिणाम म्हणून ग्रामीण जनजीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे.

निजामपूरसह घरोशी वाडी, करंबेळी, भाले, गांगवली, भिरा, पाटणूस, भागाड, कांदळगाव आदी दुर्गम भागातील नागरिकांची हालचाल फक्त एसटीवर अवलंबून आहे, मात्र काही महिन्यांपासून सुरू असलेल्या कर्मचारी तुटवड्यामुळे अनेक गाड्या रद्द केल्या जात आहेत. पहाटे बाजारात जाणाऱ्या शेतकऱ्यांपासून ते विद्यार्थी, कामगार, आजारी लोक सर्वांनाच प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. दीर्घकाळ प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, संघटक बाबूशेट खानविलकर,माजी नगरसेवक नितीन बामगुडे तसेच ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा मोठा जमाव माणगाव एसटी आगारात धडकला.

आगार व्यवस्थापक छाया कोळी यांना परिस्थितीची गंभीरता समजावून सांगताना ग्रामस्थांच्या भावना अक्षरशः ओसंडून वाहत होत्या. तक्रारी दिल्या, निवेदने दिली पण काहीच बदलले नाही! ग्रामस्थांचा आक्रोश बैठकीत जोरदारपणे घुमला. नेत्यांच्या पाठपुराव्यानंतर आगार व्यवस्थापनाने सुरुवातीला १० कर्मचारी तत्काळ हजर करण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर टप्प्याटप्प्याने भरती प्रक्रिया वेगाने सुरू करून वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याची हमी देण्यात आली.

सध्या माणगाव आगारात १०५ कर्मचारी कार्यरत असून आणखी ५३ कर्मचाऱ्यांची तातडीची गरज आहे. अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांवर प्रचंड मानसिक ताण निर्माण झाला आहे आणि आगाराला मोठे आर्थिक नुकसान होत आहे. ग्रामीण जनता रोजच्या रोज होरपळत असताना निष्क्रियतेचा अधिक कालावधी सहन केला जाणार नाही, असा इशारा नेत्यांनी दिला. निजामपूर-माणगाव परिसरातील वाहतूक व्यवस्था तत्काळ सुरळीत न झाल्यास उग्र आंदोलन उभारावे लागेल, असा ठाम इशारा ॲड. राजीव साबळे आणि बाबूशेट खानविलकर यांनी दिला.

एसटी ही फक्त सोयीची नव्हे तर जीवितवाहिनी आहे. या वाहतुकीची घडी बसल्याशिवाय ग्रामीण भागाचा शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक प्रवास थांबलेला आहे. आता व्यवस्थापनाने दिलेल्या आश्वासनांना गती मिळते का? ग्रामीण जनतेला दिलासा मिळतो का? याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# उसरोली येथे आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**



मुरूड तालुक्यातील उसरोली येथील महाआरोग्य शिबिरास गरजूंचा मोठा प्रतिसाद लाभला. ॲड. मनस्वी मोहिते यांच्या संकल्पनेतून श्री समर्थ फांउडेशन व एम.जी.हॉस्पीटल कामोठे यांचे सयुक्त विद्यमाने मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मार्गदर्शन करताना श्री समर्थ फांउडेशनच्या माध्यमातून ॲड. मनस्वी मोहिते यांचे समाजोपयोगी विविध उपक्रमाचे कौतुक भाजप सरचिटणीस ॲड. महेश माहिते यांनी केले.

ॲड.मनस्वी मोहिते संस्थापक-अध्यक्ष असलेल्या श्री समर्थ फांउडेशनच्या वतीने रविवार, २३ नोव्हेबर २०२५ रोजी उसरोली आगरी समाज हॉल येथे सकाळी ८ ते दुपारी २ वाजता मोफत महाआरोग्य शिबिर झाले. या मोफत महाआरोग्य शिबिरात नेत्र तपासणी, मोतिबिंद शस्त्रक्रिया, व चष्मा वाटप, तसेच बालरोग तपासणी, इसीसी-हृद्य तपासणी, कान घसा तपासणी, आरोग्य तपासणी, त्वचारोग तपासणी, हाडांचे विकास तपासणी, कान नाक घसा तपासणी, पोटाचे विकास तपासणी आदी विविध तपासण्या एम.जी.हास्पीटल कामोठे यांचे तज्ञ डॉक्टरांचे वतीने करण्यात आले. य उसरोली, नांदगाव, मजगांव पंचक्रोशीतील गरजूंनी या मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घेतला.

या महाआरोग्य तपासणी शिबीरातील कामोठे हास्पिटलचे तज्ञ डॉक्टर्स डॉ. आकाश, डॉ.गिरीश, डॉ. अथर्व, डॉ. शैलेश, डॉ.स्निगंधा, डॉ. रोहन, डॉ. श्रुती, तसेच सहाय्यक विक्रांत, कविता, व अमेय यांनी विशेष परिश्रम घेतले, त्यांचे स्वागत व सत्कार ॲड.महेश मोहिते व डॉ.मनस्वी मोहिते यांनी केले. या महाशिबिरास भाजपचे मुरूड तालुका पदाधिकारी व कार्यकर्ते महेंद्र चौलकर, बबलू पांगारकर, चंद्रकांत जाधव, रमेश दिवेकर, अनिल नांदगावकर, सुजित जमादार, भारत सावंत, शेषनाथ कानूगोजे, अरविंद माळी, विजय तरे, गणेश कट, डॉ. चेतन जावसेन, महेश मानकर, अविनाश वाडकर, रोशन भगत, एम.एम. ठाकूर, ॲड. मनिष ठाकूर, तसेच भाजप महिला तालुका अध्यक्ष अश्विनी ठाकूर, कल्पना अहिरे, नेहा कोतवाल, दिया कासार, सुप्रभा म्हात्रे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

या मोफत महाआरोग्य तपासणी शिबिराचा शुभारंभ भाजप दक्षिण जिल्हा सरचिटणीस डॉ.महेश मोहिते यांचे हस्ते करण्यात आला. या वेळी उपस्थति भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे स्वागत व सत्कार महा आरोग्य शिबिराचे आयोजक ॲड. महेश मोहिते व ॲड. मनस्वी मोहिते यांनी पुष्पगूच्छ प्रदान करून केले.

# वाडगाव येथे दहावीच्या परीक्षेबाबत मार्गदर्शन

**रेवदंडा : प्रतिनिधी**



अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे एस.एस.सी.बोर्ड इयत्ता दहावी परिक्षा पुर्व मार्गदर्शन शिबिरास तज्ञ शिक्षक वर्गाचे मार्गदर्शन व विद्यार्थ्याचे मोठया प्रतिसाद लाभला.

वाडगाव सामाजीक सेवाभावी संस्था यांचे विदयमाने व वाडगाव ग्रामपंचायतीच्या सहकार्याने वाडगाव राजिप शाळा सभागृहात रविवार, २३ नोव्हेबर २०२५ रोजी सकाळी ८.३० ते सायकांळी ५.०० दरम्यान एस.एस.सी.बोर्ड इयत्ता दहावी परिक्षा पुर्व मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते, या शिबीरास इंग्रजी-अँड डॉ. के.डी.पाटील, समाजशास्त्र-शुभांगी भगत, गणित-एस. के. म्हात्रे, मराठी-नेहा थळे, हिंदी-संस्कृत बिपीन राउत व करंदीकर, विज्ञान-अंकिता भानुशाली या तज्ञ शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन विदयार्थ्यांना लाभले.

या मार्गदर्शन शिबिरास वाडगाव ग्रामपंचायतीचा माजी सरपंच सरिता भगत, विदयमान सरपंच सारिका पवार उपसरपंच जयेंद्र भगत तसेच सामाजिक सेवा भावी संस्थेचे पदाधिकरी, कार्यकर्ते यांच्यासह राजिप शाळा वाडगाव यांची उपस्थिती होती. उपस्थित मार्गदर्शक तज्ञ शिक्षकवर्ग व उपस्थित मान्यवर मंडळी यांचे स्वागत वाडगाव सामाजीक सेवाभावी संस्था व राजिप शाळा वाडगाव यांचे हस्ते पुष्पगुच्छ प्रदान करून करण्यात आले.

# काशिनाथमहाराज पार्टे सन्मानित

**खालापूर : प्रतिनिधी**



कोयना पुनर्वसाहत मराठा समाज सेवा संघ, रायगड-ठाणे-पालघर जिल्हा आयोजित भव्य कीर्तन महोत्सवादरम्यान वडवळ, (ता. खालापूर) येथे झालेल्या पावन दीपोत्सव सोहळ्यात अखिल कोयना पुनर्वसाहत मराठा समाजाच्या वतीने हभप काशिनाथमहाराज पार्टे यांना सन्मानित करण्यात आले.

समाजाच्या प्रेमाने मिळालेला हा सन्मान - माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभूती ठरेल, असे मत भाजप अध्यात्मिक जिल्हा अध्यक्ष हभप काशिनाथमहाराज पार्टे यांनी या वेळी व्यक्त केले.

# शेतपळस येथील श्री आकादेवी मातेचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभागात नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असलेली भक्तांची श्रद्धास्थान शेतफळस येथील श्री आकादेवी मातेचा वज्रलेप व पुनः प्राणप्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन श्री आकादेवी मंदिरात करण्यात आले असून विभागातील भक्तगणांनी या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्यास उपस्थित राहून मातेच्या दर्शनाचा व महाप्रसादाला लाभ घ्यावा, असे आवाहन आई आकादेवी ग्रामस्थ मंडळ शेतफळस यांनी केले आहे.



प्राण प्रतिष्ठापना सोहळा म्हणजे देवी देवतांच्या निजरूप मूर्तीमध्ये प्राणशक्ती स्थापित करण्यात येणारी एक धार्मिक विधी आहे. श्री आकादेवी मातोचा वज्रलेप व पुनः प्राणप्रतिष्ठान सोहळा शुक्रवार २८ नोव्हेंबर ते रविवार ३० नोव्हेंबर या तीन दिवसीय कालावधीत शेतफळस, ता. रोहा येथे होणार आहे. शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत ग्राम प्रदक्षिणा, कलश मिरवणूक, हरिपाठ सांय. ५.३० ते सायंकाळी ७. सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत चिपळूण येथील प्रसिद्ध कीर्तनकार हभप संजय महाराज साळवी यांचे भक्तिमय कीर्तन. शनिवार २९ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायं. ६ वाजेपर्यंत गणेशपूजन, पुण्याहवाचन, विविध देवतांची स्थापना, होमहवन, निद्रवास, हरिपाठ तसेच सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत सोनापाडा डोंबिवली येथील प्रसिद्ध युवा कीर्तनकार हभप विनीत महाराज म्हात्रे यांचे सुमधूर कीर्तन होईल.

रविवार दि. ३० नोव्हेंबर रोजी धार्मिक विधी सकाळी ८ ते सांय. ४ वाजेपर्यंत होमहवन, पूर्णाहुती, आशीर्वाद, नैवेद्य, आरती तसेच दुपारी १२.२९ वाजता पुनः प्राणप्रतिस्थापना हरिपाठ सायं. ५.३० ते ७ वाजेपर्यंत. सायंकाळी ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत मूखेड पुणे येथील प्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार ऋतिका दिदी कदम यांचे श्रवणीय कीर्तन, असे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आई आकादेवी ग्रामस्थ मंडळ शेतफळस यांनी दिली आहे.

# टीम इंडिया २०१ धावांत गारद

## दक्षिण आफ्रिकेकडे ३१४ धावांची आघाडी



**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

मार्को यान्सेनच्या भेदक माऱ्यासमोर भारतीय संघातील फलंदाजांनी नांगी टाकल्यामुळे गुवाहाटी कसोटी सामन्यातील तिसऱ्या दिवसाच्या खेळात भारतीय संघाचा पहिला डाव अवघ्या २०१ धावांत आटोपला. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपला असून दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात बिनबाद २६ धावा करत ३१४ धावांची आघाडी घेतली आहे.

तत्पूर्वी सोमवारी सकाळी लोकेश राहुल आणि यशस्वी जैस्वाल यांनी बिनबाद नऊ धावांवर तिसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी रचली. राहुलच्या रूपात टीम इंडियाला पहिला धक्का बसला. दुसऱ्या बाजूला यशस्वी जैस्वालने अर्धशतक ५८ (९७) केले, पण त्यानंतर भारतीय संघाने ठराविक अंतराने विकेट गमावल्या. तळाच्या फलंदाजी कुलदीप यादव १९(१३४) आणि वॉशिंग्टन सुंदर ४८ (९२) या दोघांनी आठव्या विकेटसाठी २०८ चेंडूत ७२ धावांची भागीदारी रचली. या भागीदारीच्या जोरावरच भारतीय संघाने कसाबसा २०० धावांचा आकडा पार केला. दक्षिण आफ्रिकेच्या संघाकडून मार्को यान्सेन याने सर्वाधिक सहा विकेट्स घेतल्या. याशिवाय सायमन हार्मर याने तीन, तर केशव महाराज याने एक विकेट घेतली.

वॉशिंग्टन सुंदरच्या साथीने सर्वोच्च भागीदारी करताना कुलदीप यादवने १३४ चेंडूचा सामना करत १९ धावा केल्या. या सामन्यात कसोटी कारकिर्दीत सर्वाधिक चेंडूचा सामना करण्याचा अनोखा रेकॉर्ड त्याच्या नावे जमा झाला.

पहिल्या धावांत धमाकेदार बॅटिंगसह एका डावात सर्वाधिक षटकार मारणाऱ्या मार्को यान्सेन याने गोलंदाजीत कमालीची कामगिरी करताना सर्वाधिक सहा विकेट्स घेत नवा इतिहास रचला आहे. १५ वर्षांत पहिल्यांदा भारतीय मैदानात डावखुऱ्या जलदगती गोलंदाजाने चार किंवा त्यापेक्षा अधिक विकेट्स घेतल्याचे पहावयास मिळाले आहे.

भारताला फॉलो-ऑन टाळण्यासाठी २८९ धावा करायच्या होत्या, तथापि दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार टेम्बा बावुमाने फॉलो-ऑन लागू न करण्याचा निर्णय घेतला. आफ्रिका संघ पुन्हा फलंदाजीस उतरला. सलामीवीर रिकेल्टन १२ आणि एडन मारक्रम १२ धावांवर खेळत होते. आफ्रिकेने २२ धावा केल्या असून एकूण ३१४ धावांची आघाडी घेत सामन्यावरील आपली पकड मजबूत केली आहे.

## रोहित-विराट रचणार नवा इतिहास!

**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि हिटमॅन रोहित शर्मा आणि रनमशिन विराट कोहली पुन्हा एकदा मैदान गाजवण्यासाठी सज्ज आहेत. ३० नोव्हेंबरपासून भारत-दक्षिण आफ्रिका यांच्यातील तीन सामन्यांची वनडे मालिका रंगणार आहे. रांचीच्या मैदानात या मालिकेतील पहिल्या सामन्यात मैदानात उतरताच रोहित आणि विराट ही जोडी इतिहास रचेल.



रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी आतापर्यंत ३९१ आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळले आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात ही जोडी भारताकडून सर्वाधिक सामने खेळण्याचा सचिन तेंडुलकर आणि राहुल द्रविड या जोडीचा विक्रम मोडीत काढेल. सचिन-द्रविड या जोडीने आपल्या मोठ्या कारकिर्दीत ३९१ आंतरराष्ट्रीय सामने एकत्र खेळल्याचा रेकॉर्ड आहे.

रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघांनीही टी-२० पाठोपाठ कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ते फक्त आता वनडेतच सक्रिय आहेत. ऑस्ट्रेलिया दौऱ्यातील वनडे मालिकेतील अखेरच्या सामन्यात दोघांचा जलवा पहायला मिळाला होता. आता रांचीच्या मैदानात एकत्र मैदानात उतरताच रोहित-विराट भारताकडून सर्वाधिक सामने खेळणारी भारताची नंबर वन जोडी बनेल.



## क्रिकेट स्पर्धेत होडगाव कोंड संघ विजेता

**माणगाव : प्रतिनिधी**

शिव प्रतिष्ठान ग्रामीण क्रिकेट असोसिएशन माणगावच्या सौजन्याने स्वराज्य क्रिकेट क्लब निळगुणने कै. राहुल पांडुरंग गुगळे यांच्या स्मरणार्थ निळगुण फाटा या ठिकाणी मर्यादित षटकांची टेनिस क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आई कनकाई क्रिकेट संघ होडगाव कोंडने प्रथम क्रमांक पटकावला.

स्पर्धेचे उद्घाटन देगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच दिनेश गुगळे यांच्या हस्ते झाले. द्वितीय क्रमांक सोमजाई वीर हनुमान क्रिकेट संघ विंचवली, तृतीय रायगड वॉरियर क्रिकेट संघ हरवंडी आणि चतुर्थ क्रमांक आई सोमजाई क्रिकेट क्लब ढाळघर संघाने प्राप्त केला.

उत्कृष्ट फलंदाज किरण ढमाले, उत्कृष्ट गोलंदाज बंटी चाळके (दोघेही विंचवली), उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अभिनव गोटेकर आणि मालिकावीर अल्केश शिगवण (दोघेही होडगाव कोंड) यांची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि उत्कृष्ट खेळाडूंना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

## बाबर आझमची विराटच्या विक्रमाशी बरोबरी

**कराची : वृत्तसंस्था**



पाकिस्तानचा स्टार बॅटर बाबर आझम याने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये रोहित शर्माचा वर्ल्डरेकॉर्ड मोडल्यावर आता विराट कोहलीच्या मोठ्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. पाकिस्तानच्या मैदानात सुरू असलेल्या तिरंगी टी-२० मालिकेत बाबरने झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात अर्धशतकी खेळीसह विराटच्या रेकॉर्डची बरोबरी साधली.

आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक अर्धशतकाचा विक्रम हा विराट कोहलीच्या नावे आहे. किंग कोहलीने छोट्या फॉरमॅटमध्ये ३८ अर्धशतके झळकावली आहेत. २०१० ते २०२४ या कालावधीत १२५ सामन्यातील ११७ डावात कोहलीने ही कामगिरी नोंदवली होती. बाबर आझमने या विक्रमाशी बरोबरी साधली आहे.

## टी-२०मध्ये तब्बल ३५० धावांची पार्टनरशिप

**ब्यूनस आयर्स : वृत्तसंस्था**

क्रिकेटला अनिश्चिततेचा खेळ म्हटले जाते आणि याच अनिश्चिततेने पुन्हा एकदा इतिहास घडवला आहे. टी-२० इंटरनॅशनलमध्ये असा विक्रम झाला आहे, जो याआधी कधीच झाला नाही. अर्जेंटिनाच्या दोन महिला ओपनर्सने मिळून तब्बल ३५० धावांची अविश्वसनीय पार्टनरशिप करीत टी-२०चा नवा वर्ल्डरेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

हा विक्रम १३ ऑक्टोबर २०२३ रोजी ब्यूनस आयर्स येथे अर्जेंटिना विरुद्ध चिली महिला संघात झालेल्या सामन्यात झाला आहे. अर्जेंटिनाच्या लुसिया टेलर आणि अल्बर्टीना गलन या दोघींनी मिळून केलेली ही पार्टनरशिप टी-२० इतिहासातील सर्वात मोठी पार्टनरशिप ठरली आहे. पुरुष आणि महिला क्रिकेट मिळूनसुद्धा यापूर्वी कोणी इतक्या धावा केल्या नव्हत्या.

लुसिया टेलरने ८४ चेंडूंमध्ये १६९ धावा ठोकल्या, तर तिची ओपनिंग पार्टनर अल्बर्टीना गलन हिने ८४ चेंडूंमध्ये १४५ नाबाद धावा केल्या. दोघींनी चौफेर फटकेबाजी करत चिलीच्या गोलंदाजांना अक्षरशः घाम फोडला. लुसियाने २७ चौकार, तर गलनने २३ चौकार मारले. विशेष म्हणजे या विक्रमी धावसंख्येमध्ये एकही षटकार नव्हता.

### एका षटकात कुटल्या ५२ धावा



चिलीच्या गोलंदाजांची अवस्था इतकी बिकट झाली की एका ओवरची तर इतिहासातच नोंद झाली. चिलीच्या गोलंदाज फ्लोरेन्सिया मार्टिनेज हिने एकाच ओव्हरमध्ये ५२ धावा दिल्या, ज्यात १७ नो-बॉलचा समावेश होता. हा टी-२० इतिहासातील एका ओव्हरमधील सर्वाधिक धावा देण्याचाही विक्रम झाला आहे.

अर्जेंटिनाने हा सामना तब्बल ३६४ धावांनी जिंकला. या सामन्यात चिलीने ७३ धावा एक्स्ट्रा दिल्या, ज्यात ६४ नो-बॉल, आठ वाइड आणि एक बायचा समावेश आहे.

### सर्वोच्च स्कोरचाही विश्वविक्रम

या धडाकेबाज खेळामुळे अर्जेंटिनाने २० षटकांत फक्त एक विकेट गमावून तब्बल ४२७ धावा केल्या, जो टी-२० इंटरनॅशनलच्या इतिहासातील सर्वात मोठा स्कोर आहे. पुरुष वा महिला कोणत्याही आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात इतक्या धावा कधीच झाल्या नव्हत्या.

## वडिलांनंतर स्मृती मंधानाच्या होणाऱ्या नवऱ्याचीही तब्येत बिघडली



**सांगली : प्रतिनिधी**

भारतीय महिला क्रिकेट संघाची उपकर्णधार स्मृती मंधाना आणि संगीतकार पलाश मुच्छाल यांचे लग्न रविवारी होणार होते, परंतु वडिलांची तब्येत बिघडल्याने स्मृतीने लग्न पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. यातून सावरत नाही तोच स्मृतीचा होणारा नवरा पलाश याचीही तब्येत बिघडली आहे.


रविवारी सकाळी नाश्ता करत असताना स्मृतीचे वडील श्रीनिवास मंधांना यांची तब्येत बिघडली. थोडा वेळ वाट पाहिल्यावर रुग्णवाहिका बोलवून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्याच्या घडीला ते डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली आहेत.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, पलाश मुच्छलचीही तब्येत अचानक बिघडल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले. पलाश उपचारासाठी एका खासगी रुग्णालयात गेला होता. त्याला व्हायरल इन्फेक्शन आणि ॲसिडिटीची तक्रार होती. वृत्तानुसार त्याची प्रकृती गंभीर नाही. उपचारानंतर त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून तो त्याच्या हॉटेलमध्ये परतला आहे.

## टीम इंडियाच्या प्लॉप शोनंतर कोच बदलण्याची मागणी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ मायदेशात खेळताना आणखी एक मालिका गमावण्याच्या उंबरठ्यावर आहे. कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघाला मायदेशात हरवणे मुळीच सोपे नसायचे, पण गेल्या वर्षी न्यूझीलंडने भारतात येऊन भारतीय संघाचा क्लीन स्वीप केला होता. या विजयानंतर भारतीय संघाला मायदेशात आणखी एक मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. पहिली कसोटी गमावल्यानंतर आता दुसऱ्या कसोटीतही भारतीय संघाच्या सुपरफ्लॉप कामगिरीनंतर प्रशिक्षक गौतम गंभीरवर जोरदार टीका केली जात आहे.



राहुल द्रविडचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपल्यानंतर गौतम गंभीरची मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी आणि आशिया चषक या स्पर्धा जिंकल्या, पण कसोटी क्रिकेटमध्ये भारतीय संघाची कामगिरी खालावली. मायदेशात न्यूझीलंडविरूद्ध झालेला पराभव न पचणारा आहे. आता दक्षिण आफ्रिकेकडेदेखील भारतात कसोटी मालिका खेळताना भारतीय संघाचा सुपडा साफ करण्याची संधी आहे. हा दक्षिण आफ्रिकेसाठी ऐतिहासिक क्षण असेल, पण भारतीय क्रिकेटसाठी ही लाजिरवाणी गोष्ट असेल.

गौतम गंभीरने जुलै २०२४मध्ये भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ स्वीकारला होता. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने १७ कसोटी सामने खेळले आहेत. यापैकी सात सामन्यांमध्ये भारतीय संघाने विजय मिळवला, नऊ सामन्यांमध्ये संघाला पराभवाचा सामना करावा लागला, तर दोन सामने अनिर्णित राहिले आहेत. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाच्या विजयाची सरासरी ही ५० टक्क्यांहून कमी राहिली आहे.

दक्षिण आफ्रिकेविरूद्धच्या फ्लॉप शोनंतर गौतम गंभीरला मुख्य प्रशिक्षकपदावरून काढण्याची मागणी जोर धरू लागली आहे. एका युजरने, गंभीर गो बॅकचा मीम शेअर केला आहे.

## पृथ्वी शॉ करणार महाराष्ट्र संघाचे नेतृत्व



**मुंबई** : दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी नुकतीच भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. घरच्या मैदानावर रंगणाऱ्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत बीसीसीआयने ऋतुराज गायकवाडला संधी दिली आहे. दोन वर्षांनी तो भारतीय संघाकडून वनडे खेळण्यासाठी सज्ज आहे. त्याची टीम इंडियात एन्ट्री होताच मुंबईकर पृथ्वी शॉला कॅप्टन्सीची लॉटरी लागली आहे. देशांतर्गत क्रिकेट स्पर्धेतील सय्यद मुश्ताक अली टी-२० स्पर्धेत पृथ्वी शॉ महाराष्ट्र क्रिकेट संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे.

सय्यद मुश्ताक अली टी२० स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाने ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वाखालील संघ निवडला होता. पण ऋतुराजची टीम इंडियात वर्णी लागताच पृथ्वी शॉकडे महाराष्ट्र संघाच्या नेतृत्वाची धूरा सोवण्यात आली आहे. देशांतर्गत टी-२० स्पर्धेतील साखळी फेरीत पृथ्वीला फलंदाजीसह नेतृत्वातील कर्तृत्व दाखवून देण्याची ही चांगली संधी आहे. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सचिव कमलेश पिसाळ यांनी दिलेल्या मुलाखतीत ऋतुराज गायकवाडच्या जागी पृथ्वी शॉकडे महाराष्ट्र संघाचे नेतृत्व देण्यात आल्याची पुष्टी केली आहे.

## मारक्रमचा एकहाती फ्लाईंग झेल!

**गुवाहाटी : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दुसरा कसोटी सामना गुवाहाटीत खेळवला जात आहे. या कसोटीत भारताची फलंदाजी कोसळली.



सायमन हार्मर व मार्को यान्सनच्या गोलंदाजीसमोर भारताच्या फलंदाजांनी झटपट विकेट्स गमावल्या. यादरम्यान एडन मारक्रमने नितीश रेड्डीला बाद करण्यासाठी एक कमालीचा झेल टिपला.

भारतीय संघाच्या फलंदाजी विभागाने गुवाहाटी कसोटीत निराशा केली आहे. यशस्वी जैस्वाल व केएल राहुलने ६५ धावांची भागीदारी रचत संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर जैस्वालने अर्धशतक झळकावले, पण ५८ धावांवर तो झेलबाद झाला. यानंतर साई सुदर्शन, धुव्र जुरेल, ऋषभ पंत आणि रवींद्र जडेजा स्वस्तात बाद झाले, तर नितीश रेड्डीही चांगल्या सुरुवातीनंतर माघारी परतला.

४१व्या षटकात मार्को यान्सन गोलंदाजी करत होता. यान्सनने यापूर्वी दोन विकेट्स घेतल्या होत्या आणि तो भेदक गोलंदाजी करत होता. त्याने षटकातील चौथा चेंडू बाऊन्सर टाकला. नितीशच्या ग्लोव्हजला लागून हा चेंडू मागे गलीमध्ये गेला. चेंडू विकेटच्या मागे जाताना पाहून स्लिपमध्ये असलेल्या मारक्रमने उजव्या बाजूला डाईव्ह मारत झेल टिपला.

स्पिमध्ये उभा असलेला मारक्रम १.९ मी. अंतर डाईव्हने कापत त्याने गलीमध्ये येऊन उत्कृष्ट झेल टिपला. मारक्रमचा झेल पाहून सर्वच जण चकित झाले, तर जडेजाने डोक्यावर हात ठेवले. मारक्रमच्या या कॅचचा व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com